# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे अधिवेशन, २०२३

---

**तारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**बुधवार, दिनांक १३ डिसेंबर, २०२३ / आग्रहायण २२, १९४५ (शके)**

**मुख्यमंत्री** } **यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ५४**

---

### नागपूर महानगरपालिकेच्या भाडेपट्टयाचे (लीज) नूतनीकरण प्रक्रियेतील समस्यांचे निराकरण करण्याबाबत

**(१) * २२२१९ श्री.प्रवीण दटके, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.निलय नाईक, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर महानगरपालिकेने स्वतःचे २२ भूखंड ३० वर्षांसाठी लीज वर दिले असून लीजचे नूतनीकरण करताना महानगरपालिका प्लॉटच्या प्रीमियर व्हॅल्यूच्या तीन पट ग्राउंड रेंट वर्षाला वाढ होते, परंतु, सन २०१९ मध्ये वा त्यादरम्यान नगरविकास विभागाने उक्त रक्कमेत २४ टक्क्यांनी वाढ केल्याबाबत माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नगरविकास विभागाने २४ टक्यानी रक्कम वाढवल्याने भूखंड धारकांच्या समस्या निर्माण होऊन ४ हजारांपेक्षा अधिक लीज धारकांचे नूतनीकरण प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अनेक वर्षांपासून लीजधारक तिथे वास्तव्यास असून त्यांच्यावर आर्थिक भार येत असून लीज संदर्भातील नूतनीकरणाबाबत २४ टक्क्यांचा दंड कमी करावा अशी मागणी लोकप्रतिनिधींनी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन २४ टक्क्यांचा दंड कमी करून लीज संदर्भातील नूतनीकरणाच्या समस्यांचे निराकरण करुन शासन निर्णयात दुरुस्ती करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) नागपूर महानगरपालिकेने १५ अभिन्यास हे निवासी, ५ अभिन्यास हे झोपडपट्टी वस्त्या व २ अभिन्यास औद्योगिक प्रयोजनासाठी असे २२ अभिन्यास ३० वर्षांसाठी लीज वर दिले आहेत. या अभिन्यासामध्ये अनुक्रमे एकूण १५६९, २२२८ व २५ असे भुखंड आहेत. महानगरपालिका ठरावाद्वारे विविध प्रयोजनांकरीता दर निश्चित करत असून मनपा ठराव क्र. ३३६ दिनांक २५/११/२००८ अन्वये भुभाड्यामध्ये ३ पट वाढ करण्यात येत होती. मनपा ठराव क्र. २९९ दिनांक २०/१०/२०१८ अन्वये बाजारमुल्याच्या येणाऱ्या रकमेवर (मुल्यांकनावर) निवासी प्रयोजनाकरीता ०.०२ % व औद्यागिक

प्रयोजनाकरीता भुखंडाच्या आकारमानानुसार ०.०५ % ते ०.१० % या प्रमाणात भुभाडे आकारण करण्यात येत होती. तथापि, शासन अधिसूचना दिनांक १३ सप्टेंबर, २०१९ अन्वये धोरण निश्चित करण्यात आले असून ८ % दराने सर्व प्रयोजनाकरीता भाडेपट्टा आकारणी करण्यात आली.

(२) हे खरे नाही.

२२ अभिन्यासापैकी १५ अभिन्यासातील एकूण १५६९ भुखंड असून यापैकी सन २०१९ ला ९६९ भुखंडधारकांचे लीज नुतनीकरण बाकी होते.

महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग यांचे पत्र क्र. नामपा १२२१/ प्र. क्र. १६६ / नवि - २६ दिनांक ०६ एप्रिल, २०२२ अन्वये भाडेपट्टा/हस्तांतरण नूतनीकरण प्रकरणे मनपा ठराव क्र. २९९ दिनांक २०/१०/२०१८ अन्वये बाजारमुल्याच्या येणाऱ्या रक्कमेवर (मुल्यांकनावर) शासन अधिसुचना दिनांक १३ सप्टेंबर, २०१९ पुर्वी ज्या दराने भुभाडे आकारणी करण्यात येत होती, त्या दराने हमीपत्र घेऊन एकूण ६५ लीज नुतनीकरण करण्यात आले आहे व उर्वरित भुभंडांचे लीज नूतनीकरणाचे काम महानगरपालिकेच्या स्तरावर सुरु आहेत.

२२ अभिन्यासापैकी २ औद्योगिक अभिन्यासातील भुखंडाचे लीज ऑगस्ट, २०२३ पर्यंत अस्तित्वात होते. त्यामध्ये एकूण २५ भुखंड आहेत.

२२ अभिन्यासापैकी ०५ झोपडपट्टी वस्ती/ अभिन्यासातील २२२८ भुखंड ३० वर्षीय कालावधीकरीता भाडेपट्टयावर देण्यात आले होते. त्यापैंकी ३२७ भाडेपट्टयाचे नुतनीकरण सन २०१९ पर्यंत करण्यात आले आहे. या ५ झोपडपट्टी वस्ती/अभिन्यासामध्ये नगरविकास विभागाचे शासन निर्णय क्र. एमसीओ- २०१८/प्र.क्र.३०९/नवि-१४, दिनांक ०७ फेब्रुवारी, २०१९ अन्वये “ सर्वांसाठी घरे-२०२२” या धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मालकीच्या जमीनीवरील अतिक्रमणे नियमानुकूल करून भाडेपट्टयाने देण्याबाबत असून या झोपडपट्टी वस्त्यामध्ये टेबल सर्वे करण्यात आला व त्यानुसार यातील ८४९ पट्टेधारकांना नव्याने पट्टे देण्यात आले आहे व उर्वरित १३७९ पट्टेधारकांना नव्याने पट्टे देण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) हे खरे आहे.

लीज नूतनीकरणाचा दंड कमी करण्याबाबत लोकप्रतिनिधी यांनी लेखी तक्रार निवेदनाद्वारे केली आहे.

(४) राज्य शासनाने राज्यातील महानगरपालिकांच्या मालमत्तेचे भाडेपट्टयाद्वारे विनियोग करण्याकरीता दिनांक ०६ नोव्हेंबर, २०२३ रोजी निर्गमित अधिसूचनेद्वारे महाराष्ट्र महानगरपालिका (स्थावर मालमत्ता भाडेपट्टा नुतनीकरण अथवा हस्तांतरण) नियम २०१९ निश्चित करण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील रस्त्यांची कामे कार्यारंभ आदेश मिळूनही सुरू न करणाऱ्या कंत्राटदारांविरुध्द कारवाई करणेबाबत

**(२) * २११२५ श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील ४०० किमी लांबीच्या २१२ रस्त्यांच्या कॉँक्रिटीकरणाच्या कामांसाठी माहे जानेवारी, २०२३ मध्ये कंत्राटदारांना कार्यारंभ आदेश देण्यात आले असतानाही अद्यापपर्यंत एकाही रस्त्याचे काम सुरू झाले नसल्याची बाब दिनांक १४ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू रस्त्यांच्या कॉँक्रिटीकरणांची कामे संबंधित कंत्राटदारांनी सुरू केली नसल्याची बाब स्थानिक लोकप्रतिनिधींनी लेखी निवेदनाद्वारे मा.आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्या निदर्शनास आणून दिली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कार्यारंभ आदेश मिळूनही मुंबईतील रस्त्यांची कामे सुरू न करणाऱ्या संबंधित कंत्राटदारांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिका अखत्यारितील सुमारे ३९७ कि.मी. लांबीच्या ९१० रस्त्यांची सिमेंट कॉँक्रिटद्वारे सुधारणा करण्यासाठी एकूण पाच कंत्राटदारांना जानेवारी, २०२३ मध्ये कार्यादेश देण्यात आले होते. त्यामध्ये शहर विभागातील एका कंत्राटदारास ७२ कि.मी. लांबीचे २१२ रस्ते, पूर्व उपनगरातील एक कंत्राटदारास ७१ कि.मी. लांबीचे १८८ रस्ते व पश्चिम उपनगरातील तीन कंत्राटदारांना २५४ कि.मी. लांबीचे ५१० रस्ते कामांचा समावेश होता.त्यापैकी, शहर विभागातील कंत्राटदार मे. रोडवेज इंडिया इंफ्रा लि. यांनी मे, २०२३ अखेरपर्यंत (पावसाळ्यापूर्वी) केवळ ७ रस्त्यांची कामे नाममात्र सुरू करुन कोणतेही काम पूर्ण केले नाही. त्यामुळे मे. रोडवेज सोल्युशन इंडिया इन्फ्रा लिमिटेड या कंत्राटदारास देण्यात आलेले कंत्राट रद्द करण्यात आले आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) मे. रोडवेज सोल्युशन इंडिया इन्फ्रा लिमिटेड या कंत्राटदाराचे कंत्राट रद्द करण्यात आले असून कंत्राटदाराची कंत्राट सुरक्षा रक्कम व कंत्राट अनामत रक्कम जप्त करण्याबाबत व दंड वसुल करण्याबाबतची कायदेशीर कारवाई सुरू आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर शहरातील ऐतिहासिक लेंडी तलाव पुनर्जिवीत करण्याबाबत

**(३) * २१३२८ श्री.अभिजित वंजारी, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर शहरातील २७ एकरांमध्ये पसरलेला लेंडी तलाव सद्य:स्थितीत ६.५ एकरापर्यंत संकुचित झाला असून या तलावाच्या पुनर्जिवितासाठी केंद्र शासनाच्या अमृत २.० या अभियानांतर्गत दिनांक २ नोव्हेंबर, २०२२ च्या परिपत्रकानुसार रुपये १४.१५ कोटी अनुदान मंजूर झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनुदान मंजूर होऊन बराच कालावधी होवूनही याबाबत स्थानिक स्तरावरुन कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्याची बाब निदर्शनास आली असून, केंद्र शासनाने मंजूर केल्यानुसार आतापर्यंत किती निधी लेंडी तलावाच्या पुनर्जिवितासाठी खर्च करण्यात आला व पुढील नियोजन करण्यासाठी कोणत्या उपाययोजना करण्यात आल्या आहेत,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नागपूर जिल्ह्यातील लेंडी तलावाच्या पुनर्जिवितासाठी मंजूर झालेले अनुदान प्राप्त होण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) केंद्र पुरस्कृत अमृत २.० अभियानांतर्गत नागपूर महानगरपालिकेच्या रुपये १४.१३ कोटी किंमतीच्या लेंडी सरोवर पुनरुज्जीवन प्रकल्पास दिनांक ०२ नोव्हेंबर, २०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्यात आलेली आहे.
(२) नागपूर महानगरपालिकेमार्फत सदर प्रकल्पाची निविदा प्रक्रिया राबवून मे. आदित्य कंन्सट्रक्शन कंपनी यांना दिनांक १७ फेब्रुवारी, २०२३ रोजी कार्यादेश देण्यात आलेले असून प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर आहे.

तलावातील गाळ काढण्याचे उद्देशाने उन्हाळ्यात तलाव रिक्त करण्याच्या कामास सुरुवात करण्यात आली होती परंतु, पावसाळ्यात तलाव रिक्त करण्याचे काम तात्पुरते थांबविण्यात आले. सद्य:स्थितीस तलाव रिक्त करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

सदर प्रकल्पाचे आजमितीस कोणतेही देयक कंत्राटदारास देण्यात आलेले नसल्याने प्रकल्पावर खर्च निरंक आहे.
(३) व (४) केंद्र पुरस्कृत अमृत २.० अभियानांतर्गत नागपूर महानगरपालिकेच्या लेंडी सरोवर पुनरुज्जीवन प्रकल्पाच्या केंद्र व राज्य हिश्यापोटीच्या प्रथम हप्त्याच्या रुपये १.४१२ कोटी किंमतीची पतमर्यादा (Credit Limit) देण्यात आलेली असून सदर निधी खर्च झाल्यानंतर पुढील हप्त्याच्या निधीची पतमर्यादा नागपूर महानगरपालिकेस उपलब्ध करून देण्यात येईल.

-----------------

## महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या स्थापत्य अभियांत्रिकी सेवा परिक्षेतील पात्र उमेदवारांना शासकीय सेवेत सामावून घेण्याबाबत

**(४) * २१२९२ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी, श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक २०५९० ला दिनांक २ ऑगस्ट, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सन २०२० मध्ये घेण्यात आलेल्या महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा परिक्षेचा निकाल दिनांक ३१ मे, २०२२ रोजी जाहीर झाल्यानंतर पात्र उमेदवारांच्या यादीमधील सार्वजनिक बांधकाम विभाग व जलसंपदा विभागातील आर्थिकदृष्ट्या (ईडब्ल्यूएस) प्रवर्गातील १९६ उमेदवारांची निवड झाली असून १ वर्षापासून सदर उमेदवारांना शासन सेवेत रुजू करुन घेण्यात आले नसल्याचे दिनांक १ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत विधी व न्याय विभागाकडून अभिप्राय मागवून त्यानंतर निर्णय घेण्यात येईल असे उमेदवारांच्या शिष्टमंडळाने घेतलेल्या भेटीत मा.अप्पर मुख्य सचिव यांचेकडून सांगण्यात आले आहे तसेच पात्र उमेदवारांची नियुक्ती होण्याबाबत शासनास वेळोवेळी निवेदने देऊनही नियुक्तीस विलंब होत असल्यामुळे पात्र उमेदवारांनी आझाद मैदान, मुंबई येथे उपोषणासह आंदोलन केले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई येथे स्थापत्य अभियांत्रिकी सेवा, कर सहायक व वन सेवेतील काही उमेदवारांनी दाखल केलेल्या मूळ अर्जावर मा.न्यायाधिकरण, मुंबई यांनी दिनांक ०२ फेब्रुवारी, २०२३ रोजी दिलेल्या निकालान्वये एसईबीसी संवर्गातील उमेदवारांना ईडब्लूएस संवर्गात समाविष्ट करण्याबाबतचा शासन निर्णय दिनांक २३ डिसेंबर, २०२० रद्दबातल ठरविला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, त्याविरुध्द मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे अपील दाखल करण्यात आले असून, सदर प्रकरणी अन्य रिट याचिका देखील मा.उच्च न्यायालयात दाखल झाल्या असून शासनाची भूमिका महाधिवक्ता, महाराष्ट्र राज्य तसेच अन्य विशेष अभियोक्ता (Special Counsel) यांच्याकडून मांडली जात आहे, उक्त याचिका न्यायप्रविष्ट असून सदर प्रकरणी मा.न्यायालयाकडून अंतिम निर्णय होईपर्यंत प्रतिक्षा करणे उचित होईल असे अभिप्राय विधी व न्याय विभागाने दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, महाराष्ट्र लोकसेवा आयोग व अन्य प्राधिकरणामार्फत घेण्यात आलेल्या परीक्षांसंदर्भात अडचणी निर्माण होणार आहेत व त्याचे दुरगामी परिणाम पदभरतीमध्ये होणार असून सदर उमेदवारांना नियुक्त्या देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा परीक्षा, २०२० मधील सहायक कार्यकारी अभियंता, सहायक अभियंता श्रेणी-१, सहायक अभियंता श्रेणी-२ या पदांवर शिफारस केलेले ईडब्लूएस प्रवर्गातील २१ उमेदवारांना वगळून उर्वरित १९६ उमेदवारांना नियुक्ती देण्याबाबत जलसंपदा विभागाने दिनांक १७/११/२०२३ व सार्वजनिक बांधकाम विभागाने दिनांक १०/११/२०२३ रोजी आदेश निर्गमित केले आहेत.

(३), (४) व (५) होय, हे खरे आहे.

सदर प्रकरणी मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई येथे स्थापत्य अभियांत्रिकी सेवा, कर सहायक व वन सेवेतील काही उमेदवारांनी दाखल केलेला मूळ अर्जावर मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई यांनी दिनांक ०२/०२/२०२३ रोजी दिलेल्या निकालान्वये दिनांक २३/१२/२०२० चा शासन निर्णय रद्द ठरविला आहे. त्याविरुध्द मा.उच्च न्यायालयात अपील दाखल करण्यात आले आहे. तसेच संबंधित परीक्षांमधील उमेदवारांनी सुध्दा याचिका न्यायालयात दाखल केल्या आहेत. सदर प्रकरणी मा.महाधिवक्ता महाराष्ट्र राज्य तसेच विशेषसमुपदेशक यांच्यामार्फत मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे शासनाची प्रभावी भूमिका मांडली जात आहे. सदर प्रकरणी अंतिम निर्णयार्थ मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दिनांक १८/१०/२०२३ ते दिनांक २/११/२०२३ या कालावधीपर्यंत नियमित सुनावणी झाली ज्यात शासनाच्यावतीने मा.महाधिवक्ता, महाराष्ट्र राज्य यांनी मा.न्यायालयात बाजू मांडली असून अंतिम

निर्णयार्थ प्रकरण राखून ठेवण्यात आले आहे. उक्त याचिका न्यायप्रविष्ट असल्याने ईडब्लूएस प्रवर्गातून शिफारस करण्यात आलेल्या उमेदवारांची नियुक्तीबाबत या प्रकरणी प्रतिक्षा करणे उचित होईल असे अभिप्राय विधी व न्याय विभागाने दिले आहेत.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**छत्रपती संभाजीनगर शहरातील शासकीय, खाजगी रुग्णालयांमधील कचरा जमा करण्यासाठी नेमणूक केलेली खाजगी कंपनी नियमबाह्य कामे करीत असल्याबाबत**

**(५) * २१७३८ श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रामदास आंबटकर, श्री.प्रवीण दटके, श्री.निलय नाईक, प्रा.राम शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात छत्रपती संभाजीनगर शहरातील सर्व शासकीय, खाजगी रुग्णालयांमधील कचरा जमा करण्यासाठी नाशिक येथील एका खाजगी कंपनीची नेमणूक केली असून गत वीस वर्षापासून सदर कंपनी नियमबाह्य पध्दतीने काम करीत असल्याची बाब माहे ऑगस्ट, २०२३ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कंपनी कचऱ्यावर शास्त्रोक्त पध्दतीने प्रक्रिया करत नसल्यामुळे प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या सर्व नियमांचे उल्लंघन केले जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या कचऱ्यावर शास्त्रोक्त पध्दतीने प्रक्रिया करण्यासाठी तसेच केशकर्तनालयाच्या कचऱ्यासाठी तरतूद करुन आधुनिक पध्दतीने बायोमेडिकल वेस्ट प्रकल्प उभारणीसाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) हे खरे नाही.

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका कायक्षेत्रांतर्गत खाजगी व शासकीय रुग्णालयातील जैव-वैद्यकीय कचरा उचलून त्याची शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावण्यासाठी मे.वॉटरग्रेस प्रोडक्टस या कंपनीसोबत दिनांक १४/०२/२००३ रोजी कार्यादेश देण्यात आलेला होता.त्यानुसार गेल्या २० वर्षांपासून कंपनी कार्यरत होती. सदरील कंपनी शास्त्रीय पध्दतीने प्रक्रिया करत नसल्याबाबत भारतीय वैद्यकीय संघटना (IMA) तसेच संबंधित रुग्णालयाकडून कोणतीही तक्रार महानगरपालिकेकडे प्राप्त झाली नाही.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून सदरील कंपनीच्या कार्यप्रणालीबाबत पाहणी करुन त्यांना Combined Consent and BMW Authorization (CCA) देण्यात येते.

(३) जैव-वैद्यकीय कचऱ्यावर आधुनिक पध्दतीने प्रक्रिया करण्यासाठी भाभा अनुसंधान शोध केंद्र (BARC) मुंबई येथे प्रत्यक्ष प्रकल्प पाहणी महानगरपालिकेकडून करण्यात आली. त्यानुसार एअर प्लाझ्मा भस्मीकरण तंत्रज्ञान या आधुनिक तंत्रज्ञानावर आधारीत कार्यपध्दतीनुसार जैव-वैद्यकीय कचऱ्याचे तसेच केशकर्तनालयाच्या कचऱ्यावर प्रक्रिया करण्याबाबत नविन निविदा प्रक्रिया राबविण्याची कार्यवाही महानगरपालिकेच्या विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील दिव्यांग, वृध्द व निराधारांना विविध योजनेंतर्गत देण्यात येणाऱ्या मानधनात वाढ करण्याबाबत

**(६) * २१५६२ श्री.प्रसाद लाड, श्री.प्रवीण दटके, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.निलय नाईक, श्री.रमेश कराड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोर्डी (ता.अकोट, जि.अकोला) येथील वृध्द, निराधार लाभार्थ्यांना माहे एप्रिल, २०२३ ते सप्टेंबर, २०२३ या कालावधीतील संजय गांधी निराधार योजनेचे अनुदान थकित असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिव्यांग नागरिकांना विविध योजनेंतर्गत दरमहा रुपये १००० एवढे अनुदान लाभार्थ्यांना वेळेवर मिळत नसून त्यात वाढ करून तीन हजार रुपये करावे आणि एका कुटुंबात जास्त लाभार्थी असल्यास त्यांच्या अनुदानात किमान पाच हजार इतकी वाढ करावी अशी मागणी दिव्यांग नागरिकांकडून करण्यात येत असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राज्यातील दिव्यांग तसेच निराधारांसाठी नवीन सुसज्ज योजना तयार करून विविध योजनांतर्गत दरमहा देण्यात येणाऱ्या मानधनात वाढ करुन सदर अनुदान विहित कालावधीत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना या योजनेतील लाभार्थ्यांच्या अर्थसहाय्यात दरमहा रुपये १०००/- वरुन रुपये १५००/- इतकी वाढ विभागाच्या दिनांक ०५ जुलै, २०२३ च्या शासन निर्णयान्वये करण्यात आली आहे.

-----------------

## धाराशिव नगरपरिषदेचे निलंबित मुख्याधिकारी यांनी केलेल्या गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत

**(७) * २१४४७ श्री.सुरेश धस :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धाराशिव नगरपरिषदेचे निलंबित मुख्याधिकारी यांच्यावर गैरव्यवहारप्रकरणी नगरपरिषद, भोकर (जि.नांदेड), नगरपरिषद माजलगाव (जि.बीड) व धाराशिव नगर परिषद अंतर्गत गुन्हे दाखल झाले असून नगरपरिषदांमध्ये संबंधित मुख्याधिकारी यांनी मोठ्या प्रमाणावर नियमबाह्य कामे करत अनेक वर्षे शासनाची फसवणुक करुन मोठ्या प्रमाणात अपसंपत्ती जमा केली असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अवैध मार्गाने संपत्ती गोळा करुन ती जवळच्या नातेवाईकांच्या नावावर केली असल्यामुळे जिल्हाधिकारी, धाराशिव ह्यांना दिनांक १० जुलै, २०२३ व पोलीस उपअधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो ह्यांना दिनांक ०५ एप्रिल, २०२३ व दिनांक २४ जुलै, २०२३ रोजी पत्र देऊनही तसेच लाचलुचपत

प्रतिबंधक विभागामार्फत तक्रार प्राप्त होऊनही अद्याप कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, निलंबित मुख्याधिकारी यांनी धाराशिव नगरपरिषदेमध्ये केलेल्या बेकायदेशीर व चुकीच्या गुंठेवारीप्रकरणी नेमलेल्या चौकशी समितीने मा.जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या दिनांक २६ जून, २०२३ रोजीच्या अंतिम अहवालात अनेक बाबी नमूद करुन जिल्हाधिकारी यांनी जा.क्र. २०२३/ न.प्र.क्र/ कार्या-१/कावी-३२८ दिनांकित ६ ऑक्टोबर, २०२३ नुसार मुख्याधिकारी, धाराशिव यांना कारवाई करण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी जिल्हाधिकारी, धाराशिव यांना आदेशित करुन व विधानपरिषद सभागृहामध्ये विविध संसदीय आयुधांव्दारे मागणी करुनही निलंबित मुख्याधिकारी यांच्या अवैध संपत्तीची लाचलुचपत विभागाकडून कारवाई करण्यास टाळाटाळ करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन गैरव्यवहार प्रकरणी विविध गुन्हे दाखल असलेल्या निलंबित मुख्याधिकारी यांच्या सर्व बँक खात्यांची, स्थावर व जंगम मालमत्तेची ACB मार्फत चौकशी करण्याबाबत तसेच सदरहू प्रकरणी दिरंगाई करणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) सदर प्रकरणी निलंबित मुख्याधिकारी यांच्याविरुध्द भोकर पोलीस स्टेशन, माजलगाव पोलीस स्टेशन व आनंदनगर पोलीस स्टेशन, धाराशिव तेथे विविध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

(२) हे खरे नाही.

सदर प्रकरणी पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धाराशिव याच्याकडे तक्रार प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून योग्य ती कार्यवाही सुरु असल्याचे, पोलीस अधीक्षक, लाचपुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर यांनी कळविले आहे.

(३) अंशतः खरे आहे.

सदर प्रकरणी प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने, जिल्हाधिकारी, धाराशिव यांच्या दिनांक २४ एप्रिल, २०२३ रोजीच्या आदेशान्वये सहायक संचालक, नगररचना, धाराशिव यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या चौकशी समितीने दिनांक २६ सप्टेंबर, २०२३ रोजीच्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, धाराशिव यांच्याकडे अंतिम चौकशी अहवाल सादर केला. सदर चौकशी अहवालाच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही करण्याबाबत मुख्याधिकारी, धाराशिव नगरपरिषद यांना जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव यांच्या दिनांक ०६ ऑक्टोबर, २०२३ रोजीच्या पत्रान्वये निर्देशित करण्यात आले आहे. त्यानुषंगाने पुढील कार्यवाही सुरु आहे.

(४) व (५) सदर प्रकरणी पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धाराशिव याच्याकडे तक्रार प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून योग्य ती कार्यवाही सुरु असल्याचे, पोलीस अधीक्षक, लाचपुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर यांनी कळविले आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शाहू, फुले, आंबेडकर निवासी /अनिवासी शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणीनुसार अनुदान देणेबाबत

**(८) * २११९९ श्री.किरण सरनाईक, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.कपिल पाटील, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सामाजिक न्याय विभागांतर्गत असलेल्या अनुसूचित जाती मुला-मुलींच्या शाहू, फुले, आंबेडकर निवासी /अनिवासी शाळा ह्या सन २००२-२००३ पासून राज्यात स्वखर्चाने सुरु असून शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणीनुसार अनुदान व विद्यार्थ्यांचे परिपोषण अनुदान मिळत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सामाजिक न्याय विभागांतर्गत अनुसूचित जातीतील मुलांच्या निवासी शाळेतील शिक्षक ७ व्या वेतन आयोगाच्या लाभांपासून अद्यापपर्यंत वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नियमीत वेतनश्रेणीनुसार १००% अनुदान मंजूर करणे, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, वैयक्तीक मान्यता व सर्व मान्यता, सेवासातत्य तात्काळ देणे, विद्यार्थी परिपोषण १०० टक्के प्रमाणे देण्यात यावे अशा मागण्यांबाबत आश्रमशाळा चालक व कर्मचारी सातत्याने पाठपुरावा करीत असून अद्याप देखील कोणताही निर्णय घेण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

शासन निर्णय, दिनांक ८ मार्च, २०१९ अन्वये राज्य शासनाने केंद्र योजनेसाठी शिफारस केलेल्या परंतु केंद्र शासनाकडून अनुदान न मिळणाऱ्या आश्रमशाळांसाठी शाहू, फुले, आंबेडकर निवासी /अनिवासी शाळा योजना सुरू करुन सन २०१९-२० या वर्षापासून २० % प्रमाणे अनुदान मंजूर करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

(३) व (४) शाहू, फुले, आंबेडकर निवासी/अनिवासी शाळा योजनेतील १६५ आश्रमशाळांना तपासणीच्या अधीन राहून नियमानुसार अनुदान देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अंतरवाली सराटी (जि.जालना) येथे संपूर्ण मराठा समाजाला आरक्षण आणि ‘कुणबी’ जातीचे दाखले देण्याच्या मागणीकरीता केलेल्या आंदोलनाबाबत

**(९) * २११६८ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.सुरेश धस, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस, श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंतरवाली सराटी (जि.जालना) गावात संपूर्ण मराठा समुदायाला आरक्षण आणि सरसकट ‘कुणबी’ असे जातीचे दाखले मिळण्यासाठी श्री.मनोज जरांगे पाटील यांनी माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये बेमुदत उपोषण आणि आंदोलन केले असल्याचे तसेच शासनाकडून ठोस आश्वासन मिळाल्यानंतर श्री.जरांगे पाटील यांनी सदर उपोषण सोडल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्री.जरांगे पाटील यांच्या आमरण उपोषणामुळे राज्यातील मराठा समाजाच्या आरक्षणाची चळवळ तीव्र होऊन अनेक ठिकाणी हिंसक आंदोलने झाली असून, माहे सप्टेंबर व ऑक्टोबर, २०२३ दरम्यान ११ तरुणांनी आत्महत्या केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यापूर्वी तत्कालीन मा.मुख्यमंत्री महोदयांनी राज्यातील मराठा समाजाला दिलेले आरक्षण मा.उच्च न्यायालयात टिकले परंतु, मा.सर्वोच्च न्यायालयात मराठा आरक्षणाची योग्य बाजू मांडण्यात तद्नंतरच्या तत्कालीन शासनाचे प्रयत्न कमी पडल्यामुळे सदर आरक्षण रद्द झाल्यामुळे जनभावना तीव्र झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर राज्य शासनाने केलेली पुनर्विचार याचिका मा.सर्वोच्च न्यायालयाने फेटाळल्यामुळे त्याविरुध्द मा.सर्वोच्च न्यायालयात उपचारात्मक याचिका (Curative Petition) दाखल करण्यात आली असून त्यात मराठा आरक्षण प्रकरणी उद्भवणाऱ्या सर्व न्यायालयीन प्रकरणी शासनाच्यावतीने प्रभावी बाजू मांडण्यासाठी ज्येष्ठ विधिज्ञांची नियुक्ती करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकरणी निर्णय घेऊन शासनाने मराठा समाजाला आरक्षण मिळण्याच्या दृष्टीने तसेच मराठा आरक्षणासाठी आत्महत्या करणाऱ्या तरुणांच्या वारसांना आर्थिक मदत देणे व शासकीय सेवेत सामावून घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे अंशतः खरे आहे.

(३) व (४) मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ५/०५/२०२१ च्या आदेशान्वये सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास वर्गाचे आरक्षण रद्द केल्यामुळे राज्य शासनाने त्याविरोधात पुनर्विचार याचिका दाखल केली होती. सदर पुनर्विचार याचिका फेटाळण्यात आल्यामुळे त्याविरुध्द मा.सर्वोच्च न्यायालयात उपचारात्मक याचिका (Curative Petition) दाखल केली आहे.

सदर उपचारात्मक याचिकेमध्ये तसेच मराठा आरक्षण प्रकरणी उद्भवणाऱ्या सर्व न्यायालयीन प्रकरणी शासनाच्या वतीने प्रभावी बाजू मांडण्यासाठी ज्येष्ठ विधिज्ञांचा विशेष कार्यगट (Task Force) स्थापन करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.

(५) याबाबत शासन स्तरावर कार्यवाही सुरू आहे.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेचा मुंबई महापौर वैद्यकीय निधी बंद असल्याने रुग्णांची गैरसोय होत असल्याबाबत

**(१०) * २१४६३ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या महापौर वैद्यकीय निधीचे वाटप दिनांक ८ मार्च, २०२२ रोजी महानगरपालिका विसर्जित झाल्यामुळे बंद झाले असून गरजू रुग्णांनी केलेले सुमारे ४०० ते ५०० अर्ज विना कार्यवाही पडून असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिका विसर्जित झाल्यानंतर विकासकामांचे कोट्यवधीचे प्रस्ताव आयुक्त मंजूर करत असल्यामुळे महापौर नसल्यामुळे हे अर्ज मंजूर करण्याचा अधिकार प्रशासक म्हणून महानगरपालिका आयुक्तांना असून हे अर्ज मंजूर करण्यास त्यांनीही नकार दिला असल्याने त्याच्यासाठी शासनातर्फे काय उपाययोजना केली अथवा करणार आहे,
(३) असल्यास, प्रशासकीय कारभारामध्ये महापौर निधी योजना अथवा तत्सम नावाने वैद्यकीय मदत म्हणून ही योजना सुरू ठेवण्यात यावी, असे निवेदन लोकप्रतिनिधीमार्फत देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, हृदय शस्त्रक्रिया, मूत्रपिंडरोपण, डायलिसिस, कर्करोग आणि इतर मोठ्या शस्त्रक्रियांसाठीही या निधीमधून आर्थिक मदत दिली जात असून हा निधी अखिल भारतीय स्तरावर कार्यरत असून सदरहू महापौर वैद्यकीय निधी गरजू रुग्णांना मिळण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) महापौर निधी समितीच्या घटनेनुसार महापौर हे सदर समितीचे पदसिध्द अध्यक्ष आहेत. तथापि, दिनांक ०८/०३/२०२२ रोजी बृहन्मुंबई महानगरपालिकेवर प्रशासकाची नियुक्ती झाल्यानंतर सदर समितीचे अध्यक्षपदही रिक्त आहे.

सदर सहाय्याकरीता माहे ऑक्टोबर, २०२३ पर्यंत एकूण ६४१ इतके अर्ज प्राप्त झाले आहेत. या सर्व अर्जांची वैद्यकीय सहाय्य वितरित करण्याच्या दृष्टीकोनातून छाननी करण्यात आली आहे.
(३) हे खरे आहे.
(४) महापौर निधी समिती कार्यरत झाल्याबरोबर सर्व पात्र रूग्णांना वैद्यकीय सहाय्य वितरित करण्याचे प्रस्तावित आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## उन्नत नगर, गोरेगाव (पश्चिम), मुंबई येथील 'जय भवानी' या इमारतीला आग लागल्याप्रकरणी चौकशी करण्याबाबत

**(११) * २१०७६ श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे, ॲड.अनिल परब, श्री.विक्रम काळे, श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उन्नत नगर, गोरेगाव (प), (मुंबई) येथील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील 'जय भवानी' या सात मजली इमारतीला लागलेल्या आगीत सात रहिवाशांचा मृत्यू व ६२ रहिवाशी जखमी झाले असून सदरहू इमारतीच्या वाहनतळाच्या परिसरात ठेवण्यात आलेल्या कपडे आणि चिंध्यांच्या गाठोड्यामुळे आग भडकत जाऊन वाहनांनीही पेट घेतल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले असल्याचे दिनांक ६ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या आगग्रस्त ठिकाणास मा.मुख्यमंत्र्यांसह, मा,पालकमंत्री यांनी प्रत्यक्ष पाहणी केल्यानंतर या अग्निकांडाची उच्चस्तरीय चौकशी समिती नेमण्यात येणार असल्याची घोषणा मा.पालकमंत्री, मुंबई उपनगर यांनी दिनांक ७ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या घटनेतील मृतांच्या कुटुंबियांना रुपये ५ लाख आर्थिक मदत व जखमींवरील उपचाराचा खर्च शासनाकडून करण्यात येणार असून मा.पंतप्रधान महोदयांकडून मृतांच्या नातेवाईकांना पीएमएसआरएफमधून (पंतप्रधान राष्ट्रीय राखीव निधी) प्रत्येकी रुपये २ लाख तर जखमींना रुपये ५० हजार देण्याचे मा.पंतप्रधान सचिवालयाकडून व मा.मुख्यमंत्री यांनी जाहीर केले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू दुर्घटनेच्या चौकशीसाठी नेमलेल्या उच्चस्तरीय समितीचा अहवाल प्राप्त झाला आहे काय, चौकशी कोणकोणत्या अधिकाऱ्यांनी केली व अहवालात काय नमूद केले आहे तसेच चौकशीअन्वये संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) मुंबईतील गोरेगांव (पश्चिम) उन्नत नगर येथील जय भवानी एस.आर.ए. को.ऑप. हाऊसिंग सोसायटी या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील इमारतीस दिनांक ०६ ऑक्टोबर, २०२३ रोजी लागलेल्या भीषण आगीत ८ रहिवाशांचा मृत्यू झाला असून, ६१ रहिवाशी जखमी झाले होते.
(२) होय, हे खरे आहे.
(३) राज्य आपत्ती प्रतिसाद निधी अंतर्गत ८ मृत व्यक्तींना प्रत्येकी रुपये ४,००,०००/- प्रमाणे एकूण मदत रुपये ३२,००,०००/- तर ६० जखमींना एकूण रुपये ४,०८,८००/- इतकी मदत वाटप करण्यात आली आहे.

तसेच, मा.मुख्यमंत्री सहायता निधी अंतर्गत ७ मृत व्यक्तींना प्रत्येकी रुपये १,००,०००/- प्रमाणे एकूण रुपये ७,००,०००/- तर ३२ जखमींना रुपये १०,८८,०००/- इतकी मदत वाटप करण्यात आलेली आहे. उर्वरित एक मयत व्यक्तीस मदत मिळणेबाबत प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.

मा.प्रधानमंत्री कार्यालयाकडील दिनांक १३/१०/२०२३ रोजीचे पत्र जिल्हाधिकारी, मुंबई शहर या कार्यालयास प्राप्त झाले असून, सदर पत्रान्वये मयत व्यक्तीस रुपये २,००,०००/- तर जखमी व्यक्तीस रुपये ५०,०००/- इतकी मदत मंजूर करण्यात आली असून, बाधितांच्या नातेवाईकांकडून ऑनलाईन पोर्टलवर माहिती भरणेकामी आवश्यक असलेली कागदपत्रे प्राप्त करुन घेऊन मा.पंतप्रधान सहायता निधीमधून मदत मिळणेकामी ऑनलाईन पोर्टलवर माहिती भरणेबाबबची कार्यवाही सुरु आहे.
(४) सदर प्रकरणी अति. महानगरपालिका आयुक्त (पश्चिम उपनगरे) यांच्या अध्यक्षतेखाली उपायुक्त (परि.४), पोलीस उप आयुक्त (परि.११) उप प्रमुख अभियंता (झो.पु.प्रा.), सहाय्यक आयुक्त (पी/दक्षिण), प्रमुख अग्निशमन अधिकारी, प्रमुख चौकशी अधिकारी, उप प्रमुख अभियंता (इमारत परवानगी सुविधा म्हाडा) यांची चौकशी समिती नेमण्यात आलेली असून, सदर समितीच्या निष्कर्ष अहवालानुसार पोलीस उप आयुक्त (परिमंडळ-११), मुंबई उप अभियंता, मुख्य कार्यकारी अधिकारी (झो.पु.प्रा.) व मुंबई अग्निशमन दल यांना कार्यवाही करण्याकरीता व दोषींवर कारवाई करण्याकरीता कळविण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयासाठी आवश्यक असणारी औषधे खरेदी अधिक दराने केल्याबाबत

**(१२) * २१६४१ ॲड.अनिल परब, श्री.सचिन अहिर, श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयासाठी आवश्यक असणारी औषधे ही मध्यवर्ती खरेदी खात्याने निश्चित केलेल्या दराच्या तीन ते पाच पट अधिक दराने स्थानिक पातळीवर खरेदी केल्याची बाब दिनांक ०१ सप्टेंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महानगरपालिकेच्या मध्यवर्ती खरेदी खात्यामार्फत ऑनलाईन पध्दतीने निविदा प्रक्रिया राबवून एकूण १२ औषध अनुसूचींची दरपत्रके निर्गमित करण्यात येतात, त्यानुसार नवीन अनुसूची दरपत्रक प्रसारित होईपर्यंत जुन्याच दराने पूर्वीच्या कंत्राटदाराकडून संमतीपत्र घेऊन औषधांची खरेदी केली जात असल्यामुळे संपुष्टात आलेल्या अनुसुचींबाबत नव्याने दरपत्रके तयार करण्यासाठी निविदा मागविण्याबाबत महानगरपालिकेमार्फत सुरु असलेल्या कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) हे खरे नाही.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्रमुख रुग्णालये तसेच उपनगरीय रुग्णालयांमध्ये दाखल होणाऱ्या सर्व रुग्णांना औषधे उपलब्ध करुन देण्याकरीता बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मध्यवर्ती खरेदी खात्यामार्फत एकूण १२ औषध अनुसूची निर्गमित होतात. सदर रुग्णालयांकडून मध्यवर्ती खरेदी खात्याने प्रसारीत केलेल्या दरपत्रिकेनुसारच औषधांची वेळोवेळी खरेदी करण्यात येते. मध्यवर्ती खरेदी खात्यामार्फत दर निश्चित केलेल्या बाबींची खरेदी स्थानिक पातळीवर केली जात नाही. तसेच, अनुसूचीवर नसलेली व वेळोवेळी रुग्णांना आवश्यक असलेली औषधे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्रचलित पध्दतीनुसार स्थानिक पातळीवर किंवा ई-दरपत्रिका काढून लघुत्तम देकारदाराकडून खरेदी केली जाते. एखादे औषध कमी प्रमाणात उपलब्ध असल्यास त्याचे पर्यायी औषध रुग्णास देण्यात येते.

नवीन अनुसूचीचे दरपत्रक प्रसारित होईपर्यंत पूर्वीच्या कंत्राटदाराकडून संमतीपत्र घेऊन जुन्याच दराने औषधांची खरेदी करण्यात येते. तसेच बाह्यरुग्ण विभाग व कक्षांमधील रुग्णांना काही विशिष्ट आजारांकरीता लागणारी महागडी औषधे ही रुग्णालयातील समाजसेवकांमार्फत देणगी स्वरुपात उपलब्ध करुन दिली जातात. दारिद्रय रेषेखालील गरीब आणि दुर्बल घटकातील रुग्णांना अनुसुचित / तात्काळ लागणारी औषधे गरीब रुग्ण धर्मादाय निधीमधून दात्यांच्या मदतीने उपलब्ध करण्यात येतात. तसेच, जननी शिशु सुरक्षा योजना, महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना व प्रधानमंत्री जन आरोग्य योजना या शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांमार्फत रुग्णांवर नि:शुल्क उपचार करुन, औषधे उपलब्ध करुन दिली जात आहेत.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मध्यवर्ती खरेदी खात्यामार्फत निर्गमित होणाऱ्या १२ अनुसूचींच्या कार्यवाहीची सद्य:स्थिती खालीलप्रमाणे आहे :-

अनुसूची क्र. १, २, ३, ५, ६, ७, १० व ११ चा कंत्राट कालावधी अद्याप सुरु आहे.

अनुसूची क्र. ४ (एक्स रे-फिल्मस, ऐमिकल्स, इसीजी रोल्स) :- अनुसूची क्र. ४ च्या निविदा मागविण्यात आल्या आहेत. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या खरेदी धोरणानुसार सदर अनुसूचीचे सर्व औषध खरेदीचे प्रमुख यांच्या अध्यक्षतेखाली लिफाफा ‘ब’ पडताळणीची तांत्रिक सभा दिनांक ०४/१२/२०२४ रोजी आयोजित करण्यात आली आहे. सदर सभेत प्रतिसादात्मक व अप्रतिसादात्मक निविदाकार

ठरविण्यात येणार आहे.

अनुसूची क्र. ८ (निडल्स ॲण्ड सिरिंजस) :-अनुसूची क्र. ८ करीता जास्तीत जास्त प्रतिसाद प्राप्त होण्याकरीता सदर निविदेची नियत दिनांक ०४/१२/२०२३ पर्यंत वाढविण्यात आली आहे.

अनुसूची क्र. ४ व अनुसूची क्र. ८ मधील पूर्ण परिमाणाचा वापर न झाल्यामुळे व नवीन निविदाची प्रक्रिया चालू असल्यामुळे मागील दरानुसार उर्वरित परिमाणाच्या औषधांची खरेदी केली जात आहे.

अनुसूची क्र. ९ (सर्जिकल सुचर्स) मधील (मागील दरपरिपत्रकातील) पूर्ण परिमाणाचा वापर न झाल्यामुळे मागील दरानुसार उर्वरित परिमाणाच्या औषधांची खरेदी केली जात आहेत. परिमाण निश्चित करुन नवीन निविदा मागविण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

अनुसूची क्र. १२ (मेडिकल ऑक्सिजन व नायट्रस ऑक्साइड) :- सदर अनुसूचीच्या मागील निविदांचा कंत्राट कालावधी दिनांक १८/०५/२०२३ रोजी संपुष्टात आला असून, परंतु पूर्ण परिमाणाचा वापर न झाल्यामुळे सदर बाबी उपलब्ध होण्याकरीता मागील निविदांचा कंत्राट कालावधी माहे मार्च, २०२४ पर्यंत वाढविण्यात आला आहे. नवीन कंत्राट कालावधीसाठी मागविण्यात आलेल्या निविदांचे दर खूपच जास्त असल्याने सदर बाबीसाठी पुनर्निविदा मागविण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सामाजिक न्याय विभागाकडून इतर मागास बहुजन कल्याण विभागास ३७० पदे वर्ग करण्याबाबत

**(१३) * २१३६७ श्री.गोपिचंद पडळकर : तारांकित प्रश्न क्रमांक १३१६४ ला दिनांक २४ मार्च, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडून विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभागासाठी दिनांक १३ ऑगस्ट, २०१८ व दिनांक २५ जून, २०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये तसेच दिनांक १७ फेब्रुवारी, २०२० च्या उप समितीच्या बैठकीमध्ये घेण्यात आलेल्या निर्णयानुसार ३७० पदे वर्ग करण्याबाबत मान्यता देण्यात आली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सामाजिक न्याय विभागाकडून इतर मागासवर्ग विभागामध्ये गत पाच वर्षांत केवळ पाच अधिकारी वर्ग करण्यात आले असून, क्षेत्रिय स्तरावर पुरेसे मनुष्यबळ नसल्यामुळे इतर मागासवर्गासाठी असणाऱ्या योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी अनेक अडचणी येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर ३७० पदे सामाजिक न्याय विभागाकडून इतर मागासवर्ग विभागास वर्ग करावी अशी मागणी सह्याद्री येथे झालेल्या बैठकीदरम्यान लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री व मा.उपमुख्यमंत्री महोदयांकडे माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडून सदरहू ३७० पदे इतर मागासवर्ग विभागास वर्ग करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.

दिनांक १७/०२/२०२० रोजीच्या उपसमितीच्या बैठकीत सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने त्यांच्याकडून वर्ग होणाऱ्या ३७० पदांऐवजी २९४ पदे वर्ग करण्यास सहमती दर्शविली आहे.

(२) हे खरे नाही.

शासन निर्णय दिनांक ०९/०६/२०१७ अन्वये सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागातील (खुद्द) विविध संवर्गातील २९ पदे इतर मागास बहुजन कल्याण विभागास हस्तांतरित करण्यात आली आहेत.

उप आयुक्त, समाज कल्याण व तत्सम, गट-अ संवर्गातील ५ अधिकाऱ्याना दिनांक २१/११/२०२२ च्या आदेशान्वये इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या क्षेत्रिय कार्यालयात प्रतिनियुक्तीने नियुक्ती देण्यात आली आहे. तसेच इतर मागास बहुजन कल्याण संचालनालयामध्ये सद्य:स्थितीत २४ अधिकारी/ कर्मचारी कार्यरत आहेत.

(३) व (४) मा.मंत्रिमंडळाच्या दिनांक २८/०६/२०२३ रोजी झालेल्या बैठकीमध्ये देण्यात आलेल्या निदेशानुसार मा.मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली दिनांक १४/०७/२०२३ रोजी बैठक आयोजित करण्यात आली. सदर बैठकीमध्ये सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडून वर्ग होणारी प्रत्येकी ७८ रिक्त पदे वर्ग करावीत, तसेच उर्वरित वर्ग होणाऱ्या पदसंख्येतील पदांपैकी ५० टक्के पदावर अधिकारी/कर्मचारी यांचेकडून इतर मागास बहुजन कल्याण विभागास वर्ग होण्याबाबत विकल्प मागवून तात्काळ अधिकारी/कर्मचारी वर्ग करण्याबाबत निदेश देण्यात आलेत. त्यानुसार प्राप्त विकल्पानुसार ६६ पदांसह प्रत्यक्ष कर्मचारी तसेच कनिष्ठ लिपिक संवर्गातील ७८ रिक्त पदे व शिपाई संवर्गातील ७८ रिक्त पदे अशी एकूण २२२ पदे शासन निर्णय दिनांक ३१/१०/२०२३ अन्वये इतर मागास बहुजन कल्याण विभागास वर्ग करण्यात आली आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ सुंदर बस स्थानक अभियानाची अंमलबजावणी करण्याबाबत

**(१४) * २२२१७ श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाकडून हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ सुंदर बस स्थानक अभियान संपूर्ण राज्यात राबविले जात असून याअंतर्गत सर्वेक्षणाची पहिली फेरी माहे मे व जुन, २०२३ या कालावधीमध्ये पार पडली असून यामध्ये राज्यातील ५७७ बस स्थानकांपैकी ३९४ बस स्थानकांची दुरवस्था झाली असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रवाशांना चांगल्या सोयी- सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी महाराष्ट्र राज्य मार्ग व परिवहन महामंडळाकडून कोट्यवधी निधी खर्च करूनही स्थानिक प्रशासनाकडून होत असलेल्या दुर्लक्षामुळे नागरिकांना असुविधांचा सामना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महारेलच्या माध्यमातूनही राज्यातील बसस्थानके विमानतळाप्रमाणे बांधून अद्ययावत करण्यात येवून त्याची सुरुवात नागपूर बसस्थानकापासून करण्यात येईल अशी घोषणा शासनाने केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील ग्रामीण भागाची जीवनवाहिनी समजल्या जाणाऱ्या राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बस स्थानकांचे नुतनीकरण करून नागरिकांना अद्यावत सोयी-सुविधा उपलब्ध करण्याच्या दृष्टीने हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ सुंदर बस स्थानक अभियानाची संपूर्ण राज्यात प्रभावीपणे अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केल्या आहेत वा करण्यात येत आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) अंशत: खरे आहे.

हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ सुंदर बसस्थानक अभियान संपूर्ण राज्यात राबविले जात असून सदर अभियानाचे पहिले सर्वेक्षण माहे मे-जून, २०२३ या कालावधीत पार पडले असून सदर अभियानाचा सर्वेक्षणाचा हा पहिला टप्पा आहे. बसस्थानकांना देण्यात येणाऱ्या १०० गुणांची बसस्थानक परिसर व शौचालये-५० गुण, बस स्वच्छतेसाठी एकूण-२५गुण, तसेच प्रवासी अभियानासाठी-२५ गुण अशी विभागणी केलेली आहे. तथापि, बसस्थानकांच्या सर्वेक्षणात ५० च्या आतील ३०९ बसस्थानके असून ५१ ते ७० गुणसंख्येतील बसस्थानकांची संख्या २२१ इतकी आहे तसेच ७० गुणांच्या वरिल बसस्थानकांची संख्या ३० आहे. सदर अभियान प्रभावीपणे राबविणेसाठी गुणसंख्येच्या अग्रस्थानी येण्यासाठी विभागांना प्रोत्साहन देण्यात येत आहे.

(२) व (३) नाही.

(४) व (५) "हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ सुंदर बसस्थानक अभियान" राबविले जात असून सदर अभियान यशस्वीरित्या राबविण्यासाठी विभागीय/घटक स्तरावर वेळोवेळी सुचना देण्यात आलेल्या आहेत. सदर अभियानादरम्यान प्रभावीपणे अंमलबजावणीसाठी स्वारस्य अभिव्यक्ती सूचना प्रसारीत करण्यात आलेल्या आहेत. तसेच बसस्थानकांचे स्वारस्य अभिव्यक्तीव्दारे विविध संस्था, उद्योगसमुह यांनाव्दारे बसस्थानके दत्तक घेऊन तसेच रा.प.महामंडळाव्दारे बसस्थानकांच्या रंगरंगोटीचे, तसेच बसस्थानकांच्या स्वच्छतेची व सुशोभीकरणाची कामे करण्यात येत आहेत. दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२३ अखेर रा.प. महामंडळातर्फे ११८ व प्रायोजकामार्फत १०५ अशी एकूण २२३ बसस्थानकांची रंगरोटी झालेली आहे.

रा.प. महामंडळातील सर्व बसस्थानकावरील प्रसाधनगृह आणि एस.टी. आगार स्वच्छ व सुंदर ठेवण्यासाठी दिनांक ०१/०५/२०२३ पासून सुरु असलेल्या "हिंदुहृद्य बाळासाहेब ठाकरे स्वच्छ, सुंदर अभियान" अंतर्गत परिपत्रक क्र.राप/जसं/२३५, दिनांक ०४/०७/२०२३ अन्वये सर्व विभाग नियंत्रकाना स्वच्छतेच्या व सर्वेक्षणाच्या सुचना देण्यात आल्या आहेत. त्याप्रमाणे दर दोन महिन्यानी प्रसाधनगृह स्वच्छतेचे सर्वेक्षण करण्यात येते व त्याचे गुणपत्रक जनसंपर्क खात्याकडे पाठविण्यात येते.

----------------

## देवळी (जि.वर्धा) येथील औद्योगिक वसाहतीतील प्रदूषण रोखण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत

**(१५) * २१५९४ श्री.रामदास आंबटकर, श्रीमती उमा खापरे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देवळी (जि.वर्धा) येथील औद्योगिक वसाहतीमध्ये एस एम डब्ल्यू इस्पात लिमिटेड कंपनीकडून स्टील उद्योग कोळशापासून २५ मेगावॅट व आयर्नच्या धुरापासून २५ मेगावॅट क्षमतेचा विद्युत प्रकल्प उभारण्यासाठी तसेच डीआरआयच्या नियोजित प्रकल्पासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या वतीने जनसुनावणी घेण्यात आल्याची बाब माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जनसुनावणीत देवळीसह अन्य परिसरातील नागरिकांनी विस्तारित कारखान्यातील वाढते प्रदूषण तसेच इतर बाबीवर आक्षेप नोंदवून प्रदूषणाला आळा घालण्याच्यादृष्टीने विस्तारित प्रकल्प न राबविण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने देवळी (जि.वर्धा) येथील औद्योगिक वसाहतीमध्ये विविध प्रकल्पांतर्गत होणारे प्रदूषण रोखण्याच्यादृष्टीने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

सदर जनसुनावणी दरम्यान उपस्थित नागरिकांनी त्यांचे प्रस्तावित प्रकल्पाविषयी निवेदने व आक्षेप मौखिक व लेखी स्वरूपात नोंदविले होते. सदर निवेदने, आक्षेप व सूचना यांची नोंद घेवून सदर बाबी या जनसुनावणी दरम्यानच्या इतिवृत्तात नमुद केलेल्या असून इतिवृत्त दिनांक २६/१०/२०२३ रोजी पर्यावरण, वने व जलवायु परिवर्तन मंत्रालय, भारत सरकार यांच्याकडे पुढील कार्यवाहीकरीता पाठविण्यात आले आहे.

(३) औद्यागिक वसाहतीमध्ये विविध प्रकल्पाअतंर्गत होणाऱ्या प्रदूषणाला रोखण्याच्या दुष्टीने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत उद्योगांना संमतीपत्र हे अद्ययावत जल व हवा प्रदूषण नियंत्रण यंत्रणा बसविण्याच्या अटी व शर्तीनुसारच प्रदान करण्यात येते व अशी यंत्रणा स्थापित केल्यानंतरच उद्योग सुरु करण्याची परवानगी (Consent to Operate) देण्यात येते.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत उद्योगाच्या धुराड्यांमधुन उत्सर्जित होणाऱ्या धुळीकणाचे वेळोवेळी घेण्यात आलेले नमुने हे विहित मर्यादेपेक्षा जास्त आढळून आल्यामुळे मे. एमएसडब्ल्यू इस्पात या उद्योगाच्या दिनांक १३/०७/२०२३ च्या संमतीपत्राच्या अटीनुसार रुपये ५.०० लाखाची बँक हमी जप्त करण्यात आली आहे. तसेच प्रदूषण रोखण्याबाबत संबंधितांना लेखी निर्देश जारी करण्यात आले असून विहित वेळेत पूर्तता न केल्यास कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोरेगांव (जि.सातारा) नगरपंचायतीमधील रस्त्यांच्या कामांमध्ये कोट्यवधीच्या रकमेत अनियमितता झाल्याबाबत

**(१६) * २११८० श्री.शशिकांत शिंदे, श्री.अरुण लाड : तारांकित प्रश्न क्रमांक १८८२० ला दिनांक २६ जुलै, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरेगांव (जि.सातारा) नगरपंचायतीत ट्रिमिक्स काँक्रिट रस्त्यांच्या केलेल्या कामात कोअर ट्युब टेस्ट न करता तसेच अंदाजपत्रकास सार्वजनिक बांधकाम विभाग अथवा राष्ट्रीय महामार्ग विकास प्राधिकरणाकडून कोणतीही तांत्रिक मान्यता न घेता, चाचण्या न करता कोट्यवधी रक्कमेची अनियमितता झाली असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोट्यवधी रकमेच्या अनियमिततेस जबाबदार असणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

• शासन निर्णय दिनांक १८/११/२०१७ अन्वये नागरी स्थानिक संस्थाच्या विविध कामांना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून तांत्रिक मान्यता घेण्याची मुभा असून कोरेगांव नगरपंचायतीने ट्रिमिक्स काँक्रिट रस्त्याच्या कामासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सातारा यांच्याकडून दिनांक १५/९/२०२२ रोजी तांत्रिक मंजूरी व जिल्हाधिकारी, सातारा यांच्या दिनांक १५/१०/२०२२ रोजीच्या आदेशान्वये प्रशासकीय मंजूरी घेण्यात आली आहे.

• सदरच्या कामांपैकी पूर्ण झालेल्या ५ ठिकाणी काँक्रीट कोअर ट्यूब टेस्ट घेण्यात आल्या असून सर्व टेस्ट रिपोर्ट समाधानकारक प्राप्त झालेले आहेत.

• सदर कामासंदर्भात दक्षता व गुण नियंत्रण मंडळ, सार्वजनिक बांधकाम विभाग, सातारा यांच्यामार्फत मटेरियल टेस्टिंग करुन घेतले असून सर्व रिपोर्ट समाधानकारक असल्याचे अहवाल प्राप्त आहेत.

• तसेच कोरेगांव नगरपंचायतीने पूर्ण झालेल्या कामासंदर्भात टेक्नॉलॉजीकल युनिव्हर्सिटी शिवाजीनगर, पुणे या त्रयस्थ संस्थेमार्फत तांत्रिक लेखापरिक्षण अहवाल प्राप्त करुन घेण्यात आले असून ते समाधानकारक आहेत.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कळंबोली (नवी मुंबई) येथे सिडकोने बांधलेल्या समाज मंदिराचे लोकार्पण करण्याबाबत

**(१७) * २१७९० श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, प्रा.राम शिंदे, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, श्री.निलय नाईक, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.रामदास आंबटकर, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळंबोली (नवी मुंबई) येथील सेक्टर २१ मध्ये सिडकोने बांधलेल्या समाज मंदिराचे गत पाच वर्षापासून लोकार्पण न करण्यात आल्याने कामोठेकर नागरिक समाज मंदिराच्या प्रतीक्षेत असल्याची बाब माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत स्थानिकांनी सिडकोकडे वारंवार पत्र व्यवहार करूनही या समाज मंदिरात सिडकोने कामोठे नोड कार्यालय उभारले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सेक्टर २१ मधील सिडकोने बांधलेले समाज मंदिर सर्वसामान्य जनतेसाठी उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२) व (३) नवी मुंबई येथील कामोठे, सेक्टर २१ मधील भूखंड क्र.६७ येथील समाज मंदिरात नागरीकांच्या सोईच्या उद्देशाने सिडकोच्या अभियांत्रिकी विभागाचे कार्यालय तात्पुरत्या स्वरुपात सुरु करण्यात आले होते.

सिडको संचालक मंडळाच्या ठराव क्र. ११७७५, दिनांक १२ जानेवारी, २०१७ अन्वये सिडको संचालक मंडळाच्या अखत्यारीत येणाऱ्या खारघर, कामोठे, कळंबोली, नवीन पनवेल, तळोजा नोड येथील नागरी सेवांचे हस्तांतरण पनवेल महानगरपालिकेस करण्यास मान्यता प्राप्त झाली आहे त्यानुसार उपरोक्त समाज मंदिर पनवेल महानगरपालिकेस दिनांक २४ नोव्हेंबर, २०२३ रोजी हस्तांतरीत करण्यात आले आहे.

सदर भूखंडाचा सह दुय्यम निबंधक, पनवेल यांचेकडे नोंदणीकृत करारनामा करण्याची कार्यवाही पनवेल महानगरपालिका यांच्या स्तरावर सुरु असून त्यानंतर सदर समाज मंदिर सर्वसामान्य जनतेसाठी उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या मंचर (जि.पुणे) येथील आगाराच्या बांधकाम खर्चाबाबत

**(१८) * २१८१५ श्री.महादेव जानकर, श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने बस आगार बांधण्यासाठी मंजूर केलेल्या धोरणानुसार बस आगाराची आवश्यकता व तसे व्यवहार्य नसतानाही मंचर (जि.पुणे) येथे बांधण्यात आलेल्या आगाराकरीता करण्यात आलेला रुपये चार कोटी एवढ्या रक्कमेचा खर्च निष्फळ असल्याचे भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षकांनी (कॅग) केलेल्या अहवालात नमूद केले असल्याची बाब दिनांक १६ ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय.

(२) व (३) रा.प.मंचर आगार दिनांक १०/११/२०२३ रोजी कार्यान्वित करण्यात आलेला आहे. त्यामुळे सदर बाबतीत चौकशीची गरज नाही. तसेच परिच्छेद क्र/०३/३ रुपये ४.०५ कोटीचा निष्फळ खर्च याबाबत महामंडळाचे स्पष्टीकरण ज्ञापन सादर करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## अकोला शहरातील झोपडपट्टीवासियांना जागेचा भोगवटा मिळण्यासंदर्भातील शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्याबाबत

**(१९) * २२०४९ श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या दिनांक ०१/०१/१९९५ च्या मतदार यादीमध्ये नाव असलेल्या पात्र झोपडपट्टीवासियांना त्यांच्या भोगवटयाखालील जमिनी मालकी हक्काने किंवा भाडेपट्टयाने देवून त्यांना पर्यायी भूखंड देऊन त्यांचे पुनर्वसन करण्याबाबत शासन निर्णय निर्गमित केलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अकोला शहरामध्ये गत ४० ते ५० वर्षापासून झोपडपट्टी वस्तीमध्ये राहत असलेल्या रहिवांशाकडून अकोला महानगरपालिकेमार्फत इमलाधारक रहिवाशी म्हणून घर टॅक्स वसुल केला जात असूनही त्यांना रहिवाशी असल्याबाबतचे मालकीपट्टे किंवा भाडेपट्टे मिळाले नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अकोला शहरातील झोपपट्टीवासियांना जागेच्या भोगवटयाचा / जागेच्या मालकीचा, भाडेपट्टयाचा निकालाचा प्रश्नाबाबत जागेची मालकी पट्टे मिळण्यासंदर्भात शासनाने निर्गमित केलेल्या निर्णयाला २१ वर्षांचा कालावधी उलटूनही अद्याप शासन निर्णयावर अंमलबजावणी करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी अकोला शहरातील झोपडपट्टीवासियांना जागेचा भोगवटा मिळण्यासंदर्भात शासनाने निर्गमित केलेल्या शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्याबाबत का‍ेणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.

राज्य शासनाने दिनांक ०४ एप्रिल, २००२ च्या शासन निर्णयानुसार झोपडपट्टीवासियांना त्यांच्या भोगवट्याखालील जमिनी भाडेपट्ट्यावर देण्याबाबत निर्णय घेतला आहे व यात वेळोवेळी सुधारणा करण्यात आल्या आहेत.

सद्य:स्थितीत "सर्वांसाठी घरे-२०२२" या धोरणाच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने राज्य शासनाच्या मालकीच्या जमिनिवरील अतिक्रमणे नियमानुकूल करुन जमिनीचा भाडेपट्टा देणेबाबत दिनांक १७/११/२०१८ रोजी शासन निर्णय पारित केलेला असून त्यानुसार शासन निर्णयाची अंमलबजावणी सुरु आहे.

(२) हे अंशतः खरे आहे.

अकोला महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेवरील झोपडपट्टीधारकांना जागेचा भाडेपट्टा वाटपाची अनुषंगीक कार्यवाही सुरु आहे.

शासकीय जमिनीवरील भुखंडाचे पट्टेवाटपाचे अनुषंगाने दिनांक ०७/०२/२०१९ रोजीच्या शासन निर्णयानुसार महानगरपालिका हद्दीतील १८ गावठाण मधील भुखंडाचे अकोला महानगरपालिकेकडून सर्व्हेक्षण करण्यात आले असून, शासकीय जमिनीवरील झोपडपट्टी मधील भुखंडाचे पट्टेवाटपाबाबत महसूल विभागाकडून कार्यवाही सुरु आहे.

(३) हे खरे नाही.

(४) हे अंशतः खरे आहे.

अकोला महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेवरील झोपडपट्टीधारकांना जागेचा भाडेपट्टा वाटपाची अनुषंगीक कार्यवाही सुरु आहे.

शासकीय जमिनीवरील भुखंडाचे पट्टेवाटपाचे अनुषंगाने दिनांक ०७/०२/२०१९ रोजीच्या शासन निर्णयानुसार महानगरपालिका हद्दीतील १८ गावठाण मधील भुखंडाचे अकोला महानगरपालिकेकडून सर्व्हेक्षण करण्यात आले असून, शासकीय जमिनीवरील झोपडपट्टी मधील भुखंडाचे पट्टेवाटपाबाबत महसूल विभागाकडून कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## धाराशिव जिल्ह्यातील जुन्या दस्तऐवजांमध्ये काही ग्रामस्थांच्या नावापुढे "कुणबी" नोंद असल्याबाबत

**(२०) * २१०६६ श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मराठवाडा विभागामध्ये जुन्या दस्तऐवजांमध्ये गाव नमुना क्रमांक १४ च्या दस्तऐवजात ग्रामस्थ व नागरिकांच्या नावापुढे "कुणबी" असा उल्लेख असून त्यामध्ये मृत्यूचे कारण, जातीची नोंद तसेच स्त्री व पुरुष व त्यांचे वय असा उल्लेख असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने मराठा आरक्षणाबाबत जुन्या नोंदी तपासण्याचे काम सुरु केल्यानंतर, मराठवाडा विभागातील ८ जिल्ह्यांमध्ये सन १९१० ते १९६० पर्यंतच्या कालावधीतील आढळलेल्या नोंदीवर "कुणबी" असा उल्लेख असलेल्या नोंदी एकत्रित करुन त्याचा अहवाल संबंधित जिल्हाधिकारी, धाराशिव यांनी शासनाकडे सादर केल्याचे दिनांक ५ सप्टेंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे अंशत: खरे आहे. छत्रपती संभाजीनगर विभागातील हिंगोली, बीड व धाराशिव जिल्ह्यांमध्ये गाव नमुना क्र.१४ मध्ये ग्रामस्थ व नागरिकांच्या नावापुढे काही ठिकाणी "कुणबी" असा उल्लेख असलेल्या नोंदी आढळलेल्या आहेत.

(२) होय, हे खरे आहे.

(३) या विभागाच्या दिनांक ०७/०९/२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये मराठवाड्यातील मराठा समाजास मराठा-कुणबी, कुणबी-मराठा जात प्रमाणपत्र देण्याच्या प्रक्रियेमध्ये आवश्यक त्या अनिवार्य निजामकालीन

पुरावे, वंशावळी, शैक्षणिक पुरावे, महसूली पुरावे, निजामकाळात झालेले करार, निजामकालीन संस्थानिकांनी दिलेल्या सनदी, राष्ट्रीय दस्तावेज इत्यादी पुराव्यांची वैधानिक व प्रशासकीय तपासणी करण्याबाबत तसेच, तपासणीअंती पात्र व्यक्तींना मराठा-कुणबी, कुणबी-मराठा जातीचे जात प्रमाणपत्र देण्याची कार्यपध्दती विहित करण्यासाठी मा.न्यायमूर्ती श्री संदीप शिंदे (निवृत्त) यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील दिव्यांगांच्या विशेष शाळांतील कर्णबधीर प्रवर्गाच्या शिक्षकांना सातव्या वेतन आयोगाची थकबाकी मिळण्याबाबत

**(२१) * २१३१४ श्री.कपिल पाटील, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील कर्णबधीर प्रवर्गाच्या विशेष शाळांना तसेच विशेष शाळेतील अंध, कर्णबधीर, अपंग शाळेतील शिक्षकांना सन २०१९ पासून सातव्या वेतन आयोगाची थकबाकी अद्यापपर्यंत मिळाली नसल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२३ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विशेष कार्यशाळेतील १० पदांना सातव्या वेतन आयोगाचे लाभ मिळाले नसून विशेष शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या भरतीसाठी मान्यता मिळत नसून मुंबई, पालघर विभागाला पूर्णवेळ अधिकारी आणि कर्मचारी नसल्यामुळे सेवानिवृत्त शिक्षकांना पेन्शन, ग्रॅच्युएटी मिळाली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सामाजिक न्याय विभागाच्या दिनांक १३ सप्टेंबर, २०२२ च्या परिपत्रकाप्रमाणे सातव्या वेतन आयोगाच्या फरकाची रक्कम शाळानिहाय समाजकल्याण विभागामार्फत आयुक्त, पुणे तसेच सामाजिक न्याय विभागाकडे पाठविण्यात आली असून उक्त परिपत्रकानुसार यापुढे ही रक्कम मंत्रालय स्तरावरून अदा करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, गत एक वर्षापासून सर्व शाळांनी फरकाच्या रकमेचा तक्ता समाज कल्याण अधिकारी, ठाणे यांच्याकडे पाठविलेला असून वेतन आयोगाच्या फरकाबाबत पुरेशी रक्कम शासनाकडे उपलब्ध असतानाही सातव्या वेतन आयोगाचा फरक अदा करण्याबाबत अद्यापपर्यंत कोणत्याही प्रकारची कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करुन ठाणे जिल्ह्यातील कर्णबधीर शाळेतील शिक्षकांना सातव्या वेतन आयोगाची थकबाकी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

दिनांक २३ एप्रिल, २०२१ आणि ३० सप्टेंबर, २०२२ रोजीच्या शासन निर्णयात नमुद अटी व शर्तींच्या तपासणी करून थकबाकी अदा करण्याची कार्यवाही सुरू आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.

काही सेवानिवृत्त शिक्षकांना पेन्शन, ग्रच्युएटी मिळाली नसून अशा प्रकरणी कार्यवाही सुरू आहे.
(३) हे खरे नाही.

दिनांक १३ सप्टेंबर, २०२२ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये सातव्या वेतन आयोगाच्या फरकाची रक्कम विहित कार्यपध्दतीने शासनातर्फे आयुक्तांना व आयुक्त, दिव्यांग कल्याण आयुक्तालय, पुणे यांचेमार्फत जिल्हा कार्यालयास व जिल्हा कार्यालयामार्फत शाळांना समाजसेवार्थ प्रणालीव्दारे अदा करण्यात येतात.

(४) हे खरे नाही.

ठाण्यातील अनेक शाळांना फरकाची अंशत: तर काहींना पूर्ण रक्कम वितरीत झाली असून इतरांबाबत कार्यवाही सुरू आहे.

(५) सातव्या वेतन आयोगाच्या थकबाकी अदा करण्याबाबत बैठका घेऊन विहीत प्रस्ताव देण्याबाबत शाळांना तर ते प्रस्ताव तपासून निधी मागणी करण्यास जिल्हयांना निर्देश देण्यात आले आहेत.

(६) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

## राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे अलिबाग (जि.रायगड) येथील आगार विकसित करण्याकरीता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(२२) * २१६५१ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अलिबाग (जि.रायगड) तालुक्यात दर दिवशी पर्यटकांची मोठ्या प्रमाणात ये-जा होत असून तेथे शासकीय, निमशासकीय कार्यालये व बाजारपेठा असल्यामुळे असंख्य प्रवासी राज्य परिवहन महामंडळामार्फत वाहतूक करीत असून अलिबाग बस स्थानकात शेडमधील कोसळलेली भिंत, वाढलेली झाडे झुडपे, फेरीवाल्यांचा सुळसुळाट, पाणीटंचाई व पाणपोईची झालेली दुरवस्था व घाणीचे साम्राज्य अशा विविध समस्यांना प्रवाशांना सामोरे जावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रवाशांना दर्जेदार आणि गुणात्मक सेवा देण्याच्या उद्देशाने स्वच्छ बसेस, बसस्थानके, सुंदर बस स्थानक परिसर आणि टापटीप प्रसाधनगृहे, या त्रिसूत्रीवर आधारित अलिबाग जिल्ह्यातील बस स्थानक परिसराचे सुशोभीकरण आणि सौंदर्यीकरण करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अलिबागमधील बसस्थानकास प्रशासकीय व तांत्रिक मंजुरी मिळाली असतानाही राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या अलिबाग आगाराच्या विकासाचा प्रस्ताव निधीअभावी शासनाकडे प्रलंबित असून त्याकरीता तातडीने निधीची उपलब्धता व्हावी यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) नाही.

(२) होय.

दिनांक १ मे, २०२३ पासून रा.प.महामंडळात राबविण्यात येणाऱ्या "हिंदूह्दयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ व सुंदर बसस्थानक अभियानांतर्गत" अलिबाग बस स्थानकाची रंगरंगोटी व सुशोभिकरण करण्यात आलेले आहे.

(३) व (४) तत्कालीन मा.मंत्री (परिवहन, संसदीय कार्य) यांच्या दिनांक २१/०५/२०२० रोजीच्या पत्रान्वये दिलेल्या निर्देशानुसार, चालू राज्य दर सुचीनुसार सुधारीत अंदाजपत्रक तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## राज्यात जेष्ठ नागरिक धोरणाची अंमलबजावणी करण्याबाबत

**(२३) * २१२५८ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे, श्री.अभिजित वंजारी, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ज्येष्ठ नागरिकांचे समाजातील स्थान विचारात घेता त्यांचा वृद्धापकाळ चांगला जावा, त्यांचे जीवन सुसह्य व्हावे, शारिरीक व मानसिक आरोग्य चांगले राहावे, आर्थिक क्षमता, कामाचा हक्क मिळावा याकरीता शासनाने सर्वसमावेशक 'ज्येष्ठ नागरिक धोरण २०१३' जाहीर करुन 'ज्येष्ठ नागरिक संयुक्त कृती समिती'सह 'हेल्पएज' सारख्या सामाजिक संस्थांनी वेळोवेळी लक्ष वेधूनही त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी गत १० वर्षांपासून राज्यात होऊ शकली नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जेष्ठ नागरिक सक्षम होण्यासाठी व्यावसायिक प्रशिक्षण देणे, समुपदेशन केंद्राची स्थापना करणे, शासनाच्या निवासी संकुलात वृद्धाश्रम बांधण्याकरीता जागा उपलब्ध करून देणे, संरक्षणासाठी वॉर्डन योजना राबविणे, जिल्हा व तालुकास्तरावर पोलिसांची मदत वाहिनी सुरू करणे, खासगी वैद्यकीय सेवा देणाऱ्या डॉक्टरांनी शुल्कामध्ये सवलत देणे इत्यादी तरतुदींचा या धोरणामध्ये समावेश करण्यात आला आहे काय, तसेच कोणकोणत्या जिल्ह्यात सदर सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत,

(३) असल्यास, स्थानिक स्वराज्य संस्थेच्या अंदाजपत्रकामध्ये सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षामध्ये या धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी एकूण किती रकमेची तरतूद करण्यात आली आहे,

(४) असल्यास, ज्या ज्येष्ठ नागरिकांना त्यांची मुले व नातेवाईक देखभाल करीत नसल्यामुळे वृध्दाश्रमात रहावे लागत आहे अशा पाल्यांची नावांची यादी जाहीर करुन ज्येष्ठांच्या पालनपोषणाची जबाबदारी त्यांच्या कुटुंबियांनी घ्यावी यासाठी राज्य आणि केंद्र शासनाने सन २००७ मध्ये अधिसूचना जारी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, ज्येष्ठांच्या प्रश्नांचा अभ्यास करण्यासाठी एक मध्यवर्ती संशोधन व अभ्यास संस्था, ज्येष्ठ नागरिक आयुक्तालय, वृद्धाश्रमाची नोंदणी, मुल्यांकन, वृद्धाश्रम सल्लागार व व्यवस्थापन समिती, समुपदेशन केंद्र, देखभाल व विरंगुळा केंद्र इत्यादीं स्थापन करण्याचे आदेश शासनाने सन २०१९ मध्ये दिले असूनही या संदर्भातील जिल्हानिहाय समित्या समाजकल्याण विभागाने आणि जिल्हाधिकाऱ्यांनी स्थापन केल्या नसल्याची बाब निर्देशनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, ज्येष्ठ नागरिकांच्या मूलभूत अधिकाराच्या संरक्षणाकरीता तयार करण्यात आलेल्या धोरणातील मसुद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) होय, हे खरे आहे.

(५) हे खरे नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील विविध मार्गांवरील ब्लॅक स्पॉट कमी करण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत

**(२४) * २२२०१ श्री.रमेश कराड, श्री.प्रवीण दटके, श्रीमती उमा खापरे, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे, श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.निलय नाईक, डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सन २०२० ते सन २०२२ या कालावधीमधील अपघातांची संख्या आणि ठिकाणांचा अभ्यास केल्यानंतर राज्यात १००४ 'ब्लॅक स्पॉट' असल्याचा अहवाल महामार्ग पोलिसांनी शासनास सादर केला असून सर्वाधिक ६४ ब्लॅक स्पॉट संभाजीनगरमध्ये, अहमदनगरमध्ये ५६, धुळेमध्ये ५४, नवी मुंबईत ५३ आणि मुंबईत ४८ ब्लॅक स्पॉट असल्याची बाब दिनांक १४ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर शहरात वाहतूक व्यवस्था सुरळीत नसल्याने अपघातांचे प्रमाण वाढले असून रस्त्यावरचे ब्लॅक स्पॉट निवारण करणे, हेल्मेटचा वापर करणे, रस्ते अपघातांसाठी स्वतंत्र न्यायालय करणे, तसेच सिग्नल यंत्रणा व्यवस्थापन अधिक सक्षमपणे राबवली जावी यासाठी संसद रस्ता सुरक्षा समिती यांच्यामार्फत निवेदनाद्वारे मागणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्याची जीवनवाहिनी असलेल्या राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या गाड्यांची स्थिती अत्यंत दयनीय झाल्याने २०२२-२०२३ च्या आर्थिक वर्षात राज्यात राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे एकूण ४ हजार ६५९ अपघात झाले असून या अपघातात ३४३ नागरिकांचा मृत्यू तर ३ हजार ५८४ जण जखमी झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मुंबईत यावर्षी माहे जानेवारी ते जून, २०२३ या सहा महिन्यांच्या कालावधीत १२१ जीव घेणे रस्ते अपघात होवून १३२ जणांचे मृत्यू झाले असून परिणामी फिटनेस चाचणी न केलेली वाहने रस्त्यांवर धावत असून या अपघाताला केवळ वाहतूक नियमांचे उल्लंघन हेच एकमेव कारण नाही तर वाहनांची नियमीत तपासणी करणारी आरटीओची यंत्रणा रिक्त पदांमुळे सक्षम नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, राज्याच्या विविध महामार्गावर अपघातांची संख्या दिवसेंदिवस वाढत असून अतिवेगामुळे सर्वाधिक अपघात झाल्याची नोंद महामार्ग पोलिसांनी केली असल्याची माहिती दिनांक २७ ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने राज्यातील विविध मार्गावर असलेले ब्लॅक स्पॉट कमी करणे, एसटींचे अपघात नियंत्रणात आणणे तसेच राज्याच्या विविध महामार्गावर दिवसेंदिवस वाढत असलेल्या अपघाताबाबत कोणकोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय.

(२), (३), (४), (५) व (६) सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात रा.प.महामंडळाच्या बसेसचे एकूण ३,०१४ (२८३ प्राणांतिक, १,३६९ गंभीर व १,३६२ किरकोळ) अपघात झाले आहे. या अपघातांमध्ये ३४३ व्यक्ती मृत पावले (प्रवासी २२, रा.प. कर्मचारी १२, पादचारी ८६, त्रयस्त वाहनातील २२३) असून ३,५८४ व्यक्ती जखमी झाले आहेत (प्रवासी २२२६, रा.प.कर्मचारी २३१, पादचारी १४८, त्रयस्त वाहनातील ९७९). परंतु सदरचे अपघात हे रा.प.बसेसच्या दयनीय स्थितीमूळे झाले नसून इतर कारणांमुळे झाले आहे.

रा.प.महामंडळाच्या वाहनांच्या योग्यता प्रमाणपत्र नुतनीकरणाची कार्यवाही विहित कालावधीत परिवहन कार्यालयाकडून करुनच वाहने मार्गावर दिले जातात.

मुंबईत जानेवारी ते जून, २०२३ या ६ महिन्यांच्या कालावधीत १३२ अपघात झाले असून, त्यामध्ये १४७ मृत्यू झाले आहेत.

वाहतूकीचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांविरुध्द मोटर वाहन कायदा १९९८ अन्वये नियमित कार्यवाही केली जात आहे.

परिवहन वाहनांसाठी योग्यता प्रमाणपत्र जारी करताना केंद्रीय मोटार वाहन नियमातील तरतुदीनुसार काटेकोरपणे तपासणी करणेबाबत परिवहन आयुक्त कार्यालयाच्या स्तरावर मार्गदर्शक सुचना निर्गमीत करण्यात आलेल्या आहेत. तसेच योग्यता प्रमाणपत्र नसलेल्या वाहनांवर हायवे पथकांमार्फत कारवाई करण्यात येते.

गृह (परिवहन) विभागाचा शासन निर्णय दिनांक २३/०९/२०२२ अन्वये परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांच्या आस्थापनेवरील पदांच्या सुधारीत आकृतीबंधास मान्यता देण्यात आलेली आहे. तर गृह (परिवहन) विभागाचा शासन निर्णय दिनांक २३/०९/२०२२ अन्वये परिवहन आयुक्त कार्यालय यांच्या आस्थापनेसाठी कार्यालयनिहाय पदांची फेरवाटप करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार रिक्त पदे भरण्याची बाब कार्यवाही खाली आहे.

रा.प.बसेसचे अपघात टाळण्यासाठी महामंडळाकडून विविध उपाययोजना नियमितपणे करण्यात येत आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने चालक उजळणी प्रशिक्षण, ज्या चालकांकडून अपघात झाले आहेत अशा चालकांचे विशेष प्रशिक्षण, चालकांची नेत्र तपासणी, आरोग्य तपासणी वेळोवेळी करण्यात येते. चालकांना अपघात विरहीत सेवेबद्दल प्रोत्साहन पर बक्षिसे, बिल्ले इ. देण्यात येतात. सुरक्षितता मोहिम राबवून तसेच आगारांमध्ये बैठका घेऊन चालकांचे प्रबोधन करण्यात येत आहे.

परिवहन आयुक्त कार्यालयाच्या अधिनस्त कार्यालयाकडून तसेच NHAI व सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडून प्राप्त माहितीनुसार १००४ ब्लॅक स्पॉट वर पुढीलप्रमाणे कार्यवाही सुरु आहे.

| | |
|---|---|
| एकूण Black Spot संख्या | १००४ |
| तात्पुरत्या स्वरुपात उपाययोजना सुरु असलेल्या Black Spot ची संख्या | २०९ |
| कायमस्वरुपी उपाययोजना करण्यात आलेल्या Black Spot ची संख्या | २५९ |
| कायमस्वरुपी उपाययोजना सुरु असलेल्या Black Spot ची संख्या | २८९ |

ब्लॅक स्पॉट वर अपघाताचे प्रमाण कमी करण्याकरीता अल्पकालीन व दिर्घकालीन उपाययोजना करणेबाबत वारंवार संबंधित रस्ते विभागासोबत पत्रव्यवहार करण्यात आलेले आहे व वेळोवेळी पाठपुरावा करण्यात येतो.

वाहन चालवितांना हेल्मेटचा वापर करण्याबाबत वेळोवेळी नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात आलेली असून विना हेल्मेट वाहन चालविणाऱ्या वाहन चालकांविरुध्द वाहतूक पोलीसांतर्फे चलान कारवाई करण्यात येते आहे.

-----------------

## राज्यातील २३ जिल्हयांतील प्रादेशिक परिवहन अधिकारी व कर्मचाऱ्यांची रिक्त पदे पदोन्नतीने भरण्याबाबत

**(२५) * २१३९८ श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, डॉ.प्रज्ञा सातव, डॉ.वजाहत मिर्झा : तारांकित प्रश्न क्रमांक १५७८४ ला दिनांक २८ डिसेंबर, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील २३ जिल्ह्यांतील प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांची पदे अनेक वर्षांपासून रिक्त असून राष्ट्रीय, राज्य महामार्ग आणि तपासणी नाके आदींवर वाहन तपासणीसाठी अधिकारी व कर्मचारी यांची मोठ्या प्रमाणात आवश्यकता असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांची रिक्त असलेली पदे पदोन्नतीने भरुन परिवहन अधिकाऱ्यांची नियुक्ती केली जाणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदरील प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांच्या आणि कर्मचाऱ्यांच्या रिक्त पदांचा आढावा घेऊन सदर पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) विभागाचा शासन निर्णय दिनांक २३/०९/२०२२ अन्वये परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांच्या आस्थापनेवरील पदांच्या सुधारीत आकृतीबंधानुसार प्रादेशिक परिवहन अधिकारी संवर्गातील २८ पदे मंजूर आहेत.

विभागाचा शासन निर्णय दिनांक २३/०६/२०२३ अन्वये राज्यातील एकूण ९ उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाचा दर्जा उंचावून ९ प्रादेशिक परिवहन कार्यालये निर्माण करण्यात आलेली आहेत.

प्रादेशिक परिवहन अधिकारी संवर्गातील एकूण २८ मंजूर पदांपैकी ५ पदे भरलेली आहेत तर २३ पदे रिक्त आहेत. या रिक्त असलेल्या प्रादेशिक परिवहन अधिकारी पदांचा अतिरिक्त कार्यभार अन्य अधिकाऱ्यांकडे सोपविण्यात येऊन कार्यालयीन कामकाजाचा निपटारा करण्यात येत आहे.

(२), (३) व (४) प्रादेशिक परिवहन अधिकारी हे पद पदोन्नतीने भरावयाचे पद आहे. उप प्रादेशिक परिवहन अधिकारी संवर्गातून प्रादेशिक परिवहन अधिकारी या संवर्गात पदोन्नती देण्याची बाब कार्यवाहीखाली आहे.

-----------------

## अमरावती महानगरपालिकेच्या आयुक्तांवर कारवाई करण्याबाबत

**(२६)** * **२१५१० श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती महानगरपालिकेचे आयुक्त यांनी सांस्कृतिक भवनाच्या देखभाल दुरुस्तीच्या करारनाम्यात अवैधरित्या बदल करणे, मैदानाचे आरक्षण असलेला भूखंड वाणिज्य वापरासाठी करणे, महानगरपालिकेच्या जुन्या इमारतीवर तसेच फर्निचरवर अतिरिक्त देयके सादर करणे, आयुक्तांकरीता राखीव घरावर खर्च केल्यास बोगस देयके सादर करणे, स्वछ भारत योजनेंतर्गत कंपोस्ट डेपोकरीता काढण्यात आलेल्या निविदा आपल्या जवळील लोकांना मिळण्याच्या दृष्टीने काढणे व नवाथे मल्टीफ्लेक्स प्रकरणी विकासकास मदत करणे अशा प्रकारे अनेक कामात आपल्या पदाचा गैरवापर करुन महानगरपालिकेचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान केले असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकरणांबाबत नागरिकांनी शासनाकडे अनेक तक्रारी करुनही अद्यापही आयुक्तांवर कोणतीच कारवाई करणात आली नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने आयुक्त, अमरावती यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) अमरावती महानगरपालिकेच्या श्री संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवनाच्या देखभाल, दुरुस्ती व इतर अनुषंगिक बाबींसंदर्भात स्थायी समिती ठराव क्र. ६९ दिनांक १७ ऑगस्ट, २०१२ नुसार सदर भवन खाजगी संस्थेस कंत्राटी तत्वावर देण्याबाबत निर्णय घेण्यात आला. त्यानुसार निविदा प्रक्रिया राबविल्यानंतर स्थायी समिती ठराव क्र. १० दिनांक ०५ एप्रिल, २०२३ नुसार प्राप्त मान्यतेने मे. आनंद केटरर्स यांच्यामार्फत सुविधा व दुरुस्ती करण्याकरीता खर्चाची रक्कम भाडेपट्टयाच्या रक्कमेत समायोजीत करणे व भाडेकरार ३० वर्ष कालावधीकरीता वाढविण्याबाबत महानगरपालिकेच्या सर्व साधारण ठराव क्र. १९ अन्वये प्राप्त मान्यतेने दिनांक ०८ एप्रिल, २०१५ रोजी पुरवणी करारनामा करण्यात आला.

अमरावती शहराच्या प्रारुप विकास योजनेनुसार (दुसरी सुधारीत) सर्व्हे क्र. २९ व ३० या २/१०/ हे.आर. जागेवर आरक्षण क्र. ६२, क्रिडा संकुल प्रस्तावित आहे. मैदानाची देखरेख, दुरुस्तीकरीता आर्थिक बोजा महानगरपालिकेवर पडु नये, तसेच नागरीकांना मैदानाची सुविधा उपलब्ध होण्याकरीता महानगरपालिका ठराव क्र. ७८ दिनांक २७/०८/२०१४ नुसार क्रीडा संकुलाचे बांधकाम BOT तत्वावर करण्याबाबत निर्णय घेण्यात आला.

महानगरपालिका सर्वसाधारण सभेच्या ठराव क्र. ९ दिनांक १९ डिसेंबर, २०१९ अन्वये प्राप्त मान्यतेनुसार सभागृह, महापौर व आयुक्त यांचे दालन व इमारतीतील इतर विभागांचे कार्यालय सुधारणा करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार सदर कामाच्या ०४ ई-निविदा प्रसिध्द करण्यात आल्या. याकामाकरीता रुपये ५ कोटी ८६ लाख ४२ हजार ३२० इतका खर्च अपेक्षित आहे. स्थायी समितीच्या मंजुरीने प्राप्त निविदांतून न्युनतम दराच्या निविदेस कार्यादेश देण्यात आले आहेत. सदर काम अंतिम टप्प्यात आहे.

आयुक्त महानगरपालिका यांचे निवासस्थान सन १९२९ पासून अस्तित्वात असून कालानुरूप नुकसान झाल्याने दुरुस्तीच्या कामाकरीता विहित प्रक्रियेद्वारे कंत्राटदार नियुक्त करून रुपये ४४ लाख ६९ हजार ४५७ इतक्या किंमतीचे सदर काम पूर्ण करण्यात आले आहे.

स्वच्छ भारत योजनेंतर्गत कम्पोस्ट डेपोकरीता विकास कामाच्या निविदा शासनाच्या Maha-Tender वेबसाईट वर व GEM पोर्टल वर स्पर्धात्मक निविदा तसेच दैनिकामध्ये जाहिरात प्रसिध्द करण्यात आली. विहित निविदा प्रक्रियेचा अवलंब करुन न्युनतम दराच्या निविदाधारकास कार्यारंभ आदेश देवून कामे करण्यात येत आहेत.

महानगरपालिकेने एकूण ६७०० चौ.मि. व्यापारी संकूल प्रयोजनाकरीता आरक्षित जागेवर महानगरपालिकेचे आर्थिक हित व उत्पन्नवाढीचा विचार करुन "बांधा-वापरा व हस्तांतरित करा" या तत्वावर नवाथे मल्टीप्लेक्स व्यापारी संकुल विकसीत करण्याचा निर्णय महानगरपालिकेने ठराव क्र. ३३ दिनांक २९ सप्टेंबर, २०२२ अन्वये घेतला. या प्रकल्पाकरीता शासनाच्या महा ई-पोर्टल वर प्रथमत: दिनांक २३ सप्टेंबर, २०१३ रोजी ई-निविदा प्रसिध्द करण्यात आली. तथापि, प्रतिसाद प्राप्त न झाल्याने तीन वेळा मुदतवाढ देण्यात आली. तिसऱ्या मुदतवाढीत प्राप्त ४ निविदांपैकी महत्तम रुपये १२.४० कोटी इतके प्रिमियम देणारी निविदा वाटाघाटीने अंतिम करण्यात आली. यास स्थायी समितीच्या ठराव क्र. २७८ दिनांक २२ जून, २०१३ अन्वये मान्यता घेण्यात आली आहे.

(२) व (३) सदर प्रकरणी दिनांक १३/१०/२०२३ रोजीच्या पत्राव्दारे शासनास तक्रार प्राप्त असून याबाबत महानगरपालिकेकडून अहवाल मागविण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना निर्वाहभत्ता तसेच महाविद्यालयांना शिष्यवृत्तीची रक्कम अदा करण्याबाबत

**(२७) * २२१६६ श्री.सुधाकर अडबाले, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्री.प्रविण पोटे-पाटील, श्री.प्रवीण दटके, श्री.रमेश कराड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील उच्च व तंत्र शिक्षण घेणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्तीमध्ये शासनाकडून ४० टक्के तर केंद्र शासनाकडून ६० टक्के निधी देण्यात येत असून सन २०२०-२०२१ या शैक्षणिक सत्रापर्यंत ही संपूर्ण रक्कम महाविद्यालयांना दिली जात होती त्यानुसार प्रवेश शुल्क, शिक्षण शुल्क आणि विकास शुल्क हे महाविद्यालयाच्या खात्यात तसेच निर्वाहभत्ता व शैक्षणिक साहित्याच्या खरेदीकरीता रक्कम विद्यार्थ्यांच्या खात्यात थेट जमा करण्यात येत होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गत दोन वर्षांपासून निधीमध्ये बदल केल्यामुळे केंद्र शासनाची ६० टक्के रक्कम थेट विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात जमा होत असल्यामुळे अनेक विद्यार्थी याचा गैरफायदा घेत असून महाविद्यालयांची फी सात दिवसात द्यावी असा नियम असतानाही बहुतांश विद्यार्थी ही रक्कम महाविद्यालयांना देत नसल्यामुळे काही महाविद्यालये विद्यार्थ्यांचे कागदपत्र अडवून ठेवतात तसेच

राज्यातील जवळपास १५ हजार महाविद्यालयांचा शिष्यवृत्तीचा घोळ निर्माण झाल्याने दैनंदिन कारभार चालविणे संस्था चालकांना कठीण झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात ९६ शैक्षणिक संस्थाचालकांनी मा.उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठामध्ये दाखल केलेल्या याचिकेनुसार रुपये १५७८ कोटींचा शिष्यवृत्ती निधी कोषागारामध्ये जमा करण्यात आला असून याविरोधात मा.सर्वोच्च न्यायालयात निर्णय प्रलंबित असल्यामुळे शिष्यवृत्तीची रक्कम कोषागारामध्ये अडकून आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोषागामध्ये असलेली शिष्यवृत्तीची रक्कम विद्यार्थ्यांना व संस्थांना मिळण्यासाठी तसेच यापुढे शिष्यवृत्ती अदा करण्याच्या प्रक्रियेमध्ये एकवाक्यता राहून शिष्यवृत्तीची १०० टक्के रक्कम महाविद्यालयास आणि निर्वाह भत्त्याची रक्कम विद्यार्थ्यांना देण्याबाबत कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे अंशत: खरे आहे.
(३) होय, हे अंशत: खरे आहे.
(४) अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांबाबत राज्यशासनाचा ४०% चा हिस्सा वितरीत करण्यात आला आहे. मात्र केंद्र शासनाकडून थेट विद्यार्थ्यांना देय होणारा ६०% हिश्याबाबतचे धोरण न्यायप्रविष्ट आहे व केंद्र हिश्याची अदायगी प्रलंबित आहे.

तथापि, याबाबत राज्य शासनामार्फत केंद्र शासनास दिनांक २७/०९/२०२३ च्या पत्रानुसार केंद्र हिस्सा प्रभावीपणे वितरीत करण्याची उपाययोजना प्रस्तावित करुन सदर निधी तात्काळ वितरीत करण्याकरीता विनंती करण्यात आलेली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गंगाखेड (जि.परभणी) शहरातील पाणी टंचाईबाबत

**(२८) * २१५४२ श्री.विप्लव बाजोरिया :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गंगाखेड शहराला (जि.परभणी) भीषण पाणी टंचाईचा प्रश्न अनेक वर्षापासून भेडसावत असून दर १५ दिवसांनी अशुध्द पाणीपुरवठा होत असल्याने नागरिकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गंगाखेड शहरास दररोज पाणीपुरवठा सुरळीत होण्याकरीता मोठ्या प्रमाणात पाईपलाईनचे जाळे निर्माण करण्यासाठी लागणारा निधी नगरपरिषदेच्या नगरोत्थान निधी किंवा जिल्हा नियोजन विभागाच्या निधीमधुन उपलब्ध करून देण्याबाबत शासनस्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

गंगाखेड शहरात पिण्याच्या पाण्यासाठी साठवण क्षमता असणाऱ्या जलकुंभाची संख्या मर्यादित असल्यामुळे आठ दिवसाआड शहरास पाणीपुरवठा केला जातो. तसेच, शहरास पुरवठा करण्यात येणाऱ्या पाण्याची शुध्दता जिल्हा सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळा, परभणी यांच्याकडून तपासली जाते व त्यान्वये गंगाखेड शहरास पिण्यायोग्य पाण्याचा पुरवठा होत आहे.

(२) व (३) गंगाखेड शहराची वाढती लोकसंख्या व नवीन भाग विचारात घेता गंगाखेड नगरपरिषदेमार्फत महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत नवीन पाणीपुरवठा प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात आला असून सद्य:स्थितीस तांत्रिक मान्यतेसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास सादर करण्यात आलेला आहे.

गंगाखेड नगरपरिषदेचा पाणीपुरवठा प्रकल्पाचा प्रस्ताव तांत्रिक मान्यतेसह नगरपरिषद प्रशासन संचालनालयामार्फत शासनास प्राप्त झाल्यानंतर शासन स्तरावरील पुढील कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

## मुंबईतील शिवडी-वरळी जोडमार्गातील कामगार नगरमधील (प्रभादेवी) प्रकल्पग्रस्त कुटुंबियांना त्याच परिसरात पर्यायी घरे उपलब्ध करुन देण्याबाबत

**(२९)** * **२१६१२ श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील शिवडी-वरळी जोडमार्गातील प्रकल्पबाधीतांपैकी प्रभादेवीच्या कामगार नगरमधील ५० ते ६० कुटुंबियांना प्रभादेवी परिसरात एमएमआरडीएकडून पर्यायी प्रकल्पग्रस्त घरे किंवा घरभाडे देण्यात आले नसल्यामुळे प्रकल्पग्रस्त कुटुंबिय गत २ वर्षापासून स्वत:कडील रक्कम खर्च करुन भाड्याच्या घरात राहत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी प्रकल्पग्रस्तांसोबत मा.मुख्यमंत्री यांनी माहे मे, २०२३ मध्ये सह्याद्री अतिथीगृहात घेतलेल्या बैठकीत प्रकल्पाचे बांधकाम, भूसंपादन, प्रकल्पग्रस्त घरे, घरभाडे व कायमस्वरुपी पुनर्वसनाची कामे तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश एमएमआरडीए, बृहन्मुंबई महानगरपालिका व म्हाडाच्या अधिकाऱ्यांना देऊनही त्याची अद्याप अंमलबजावणी झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने प्रभादेवी येथील प्रकल्पग्रस्तांच्या मागण्या पूर्ण करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही. शिवडी-वरळी जोडमार्गातील प्रकल्पबाधीतांपैकी कामगार नगर-१ येथील १८५ प्रकल्पग्रस्तांचे तात्पुरते पुनर्वसन शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्या. यांच्यामार्फ़त तात्पुरत्या स्वरुपात उपलब्ध जास्मीन मिल, धारावी येथील सदनिकांमध्ये ११७ प्रकल्पग्रस्तांचे आणि सेंच्युरी मिल, वरळी येथील सदनिकांमध्ये ५९ प्रकल्पाग्रस्तांचे तात्पुरते पुनर्वसन करण्यात आलेले आहे व ९ प्रकल्पग्रस्तांना रुपये २०,०००/- प्रति माह याप्रमाणे घरभाडे देण्यात येत आहे. अशा प्रकारे सर्व १८५ प्रकल्पग्रस्तांचे तात्पुरते पुनर्वसन करण्यात आले आहे.

(२) व (३) शिवडी-वरळी उन्नत मार्गिका प्रकल्पातील रेखांकन मार्गातील कामगार नगर -२ मधील प्रत्यक्ष बाधित होणाऱ्या १६ प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन जास्मिन मिल, धारावी वसाहतीमधील शिल्लक असलेल्या २७ सदनिकांमध्ये करण्याचे प्रस्तावित होते. परंतु, सदर प्रकल्पग्रस्तांनी धारावी वसाहत येथे पुनर्वसन

करण्यास नकार दर्शविला आहे. तसेच त्यांना विकासकाद्वारे रुपये १०,०००/- दरमहा घरभाडे स्वरुपात धनादेश दिनांक ३०/०५/२०२३ रोजी जमा केले आहेत. परंतु, सदर झोपडीधारकांनी धनादेश स्विकारलेले नाही. त्यामुळे सदर प्रकल्पग्रस्तांचे अद्यापपर्यंत निष्कासन करण्यात आलेले नाही ते प्रकल्पग्रस्त सद्य:स्थितीमध्ये त्यांच्या मूळ घरात वास्तव्य करीत आहेत. तसेच प्राधिकरणामार्फत प्रकल्पाच्या रेखांकन मार्गातील अप्रत्यक्ष बाधित होणाऱ्या ४६ प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्याचे प्रस्तावित आहे. याप्रमाणे अशा एकूण प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष बाधित होणाऱ्या ६२ प्रकल्पग्रस्तांना घरभाड्यामध्ये वाढ देणे अथवा इतर ठिकाणी उपलब्ध असलेल्या सदनिकांमध्ये तात्पुरते पुनर्वसन करणे, यासंबंधी प्राधिकरण स्तरावर प्रकल्पग्रस्तांशी चर्चा करून निर्णय घेण्याबाबतची कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## औंढा नागनाथ (जि.हिंगोली) येथील बसस्थानकांमध्ये सोयी-सुविधा तसेच मानव विकासाच्या बसेस विद्यार्थ्यांना वेळेवर उपलब्ध करुन देणेबाबत

**(३०) * २१९४४ डॉ.प्रज्ञा सातव, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औंढा नागनाथ (जि.हिंगोली) येथील सोयी-सुविधांच्या अभावाबरोबर तीर्थक्षेत्राठिकाणी येणाऱ्या प्रवाशांना अनेक समस्यांचा सामना करावा लागत असून मानव विकासच्या बसेस विद्यार्थ्यांना वेळेवर मिळत नसल्याची बाब माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बसेस वेळेवर मिळत नसल्यामुळे विद्यार्थ्यांना शाळेत जाण्यासाठी विलंब होत असून याबाबत वारंवार तक्रार करुन दखल न घेतल्यामुळे बस शाळेच्या वेळेत पाठविण्याबाबत विद्यार्थ्यांनी दिनांक ३ ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्यासुमारास बसस्थानकासमोर रस्ता रोको आंदोलन केले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने याबाबत आढावा घेऊन औंढा नागनाथ येथील बस आगारात सोयी-सुविधा उपलब्ध करुन देणेबाबत तसेच मानव विकासाच्या बसेस विद्यार्थ्यांना वेळेत उपलब्ध करुन देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) नाही.

(२) दिनांक ०२/०८/२०२३ च्या निवेदनाव्दारे दिनांक ०३/०८/२०२३ च्या आंदोलनाची सुचना प्राप्त होताच आगार प्रमुख, हिंगोली यांनी तात्काळ विद्यार्थीनींसाठी मानव विकास बस उपलब्ध करुन दिली. त्यामुळे दिनांक ०३/०८/२०२३ रोजीचे आंदोलन १५ मिनीटांत मागे घेण्यात आले.

(३) व (४) रा.प.परभणी विभागामार्फत औंढा बसस्थानक येथे प्रवाशांना अद्यावत वेळापत्रक, सुसज्ज प्रसाधनगृह, पिण्याचे स्वच्छ पाणी, उपहारगृह, रसवंतीगृह, शीतपेय स्टॉल इ. सोयी - सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या असून मानव विकास कार्यक्रमांतर्गत औंढा नागनाथ तालुक्यासाठी प्राप्त ०७ मानव विकास बसेसबाबत विद्यार्थीनींची तक्रार नाही. रा.प.हिंगोली आगारामार्फत औंढा बसस्थानकावरुन शालेय

विद्यार्थींनी व विद्यार्थ्यांकरीता ४० शालेय फेऱ्या व ५९ मानव विकास फेऱ्या अशा एकूण ९९ फेऱ्यामार्फत विद्यार्थ्यांची वेळेवर वाहतूक करण्यात येते. सदर फेऱ्यामार्फत १८२३ विद्यार्थ्यांची नियमित व वेळेवर रा.प.महामंडळामार्फत वाहतूक केली जाते.

-----------------

## नौपाडा (जि.ठाणे) भागातील १८ इमारतींचा पुनर्विकास करण्याबाबत

**(३१) * २२०९९ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.प्रवीण दटके, श्री.रमेश कराड : तारांकित प्रश्न क्रमांक १७५४३ ला दिनांक १५ मार्च, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे शहरातील नौपाडा भागातील अनेक जुन्या अधिकृत इमारतींचा पुनर्विकास मेट्रो प्रकल्पामुळे प्रलंबित असून यासंदर्भात विधानपरिषद सभागृहात आमदार, महापौर, सचिव, नगरविकास आणि `महामेट्रो'चे कार्यकारी संचालक यांची समन्वय समिती स्थापन करण्याचे आश्वासन शासनाने देऊनही अद्याप यासंदर्भातील समितीची स्थापना करण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केवळ एका इमारतीच्या पुनर्विकासासाठी महामेट्रो कंपनीने ठाणे महानगरपालिकेला निर्णय घेण्याचे पत्र पाठवूनही त्यावर कार्यवाही झाली नसून या इमारतीच्या प्रस्तावाला महामेट्रो प्रकल्प मंजूर होण्याआधी परवानगी मिळाली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, १८ इमारतींचा पुनर्विकास होण्यासाठी नौपाड्यातील रेल्वे यार्डखालून महामेट्रोचा नियोजित मार्ग काढण्याबरोबरच `एमएमआरडीए'कडे प्रकल्प सोपविण्याच्या मागणीचाही विचार झालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नौपाडा (जि.ठाणे) भागातील इमारतींचा पुनर्विकास लवकरात लवकर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२), (३) व (४) ठाणे शहराच्या अंतर्गत मेट्रो प्रकल्प उभारणीचा प्रस्ताव राज्य शासनाने मंजूरी प्रदान करुन केंद्र शासनास दिनांक २२/०३/२०१९ रोजी सादर करण्यात आलेला आहे. या प्रकल्पाच्या एकूण २९ कि.मी. लांबीपैकी ३ कि.मी. लांबी नौपाडा या उप शहरातून जात आहे. मेट्रो रेल्वे ॲक्ट १९७८ नुसार नविन व जून्या इमारतीच्या पुर्नविकासास मंजूरी ही केंद्र शासनाच्या प्रकल्प मंजूरी नंतर व भूमिगत मार्गिकेच्या पूर्णतेनंतरच केली जाऊ शकते.

तथापि, मेट्रो प्रकल्पामुळे नौपाडा भागातील प्रलंबित जुन्या इमारतींचा पुनर्विकासाचे प्रश्न लोकहिताचा विचार करून मार्गी लावण्याकरीता प्रशासकीय स्तरावर आयुक्त, ठाणे महानगरपालिका व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन यांच्यामार्फत त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या पुनर्विकासाच्या प्रस्तावांना ना-हरकत प्रमाणपत्र देण्याबाबतची कार्यवाही समन्वयाने करण्यात येत आहे.

त्यानुसार ठाणे महानगरपालिकेकडे अंतर्गत वर्तुळाकार मेट्रो रेल्वे प्रकल्पाच्या आखणीमुळे बाधित होत असलेल्या ४ इमारतींच्या पुनर्बांधणीचे प्रस्ताव प्राप्त झालेले आहेत. सदर प्राप्त प्रस्तावांपैकी २

प्रस्तावांना मंजुरी प्रदान करण्यात आली आहे. तसेच एका प्रस्तावात पार्किंगच्या कमतरतेची पूर्तता होत नसल्याने ती करून सुधारीत प्रस्ताव सादर करण्याबाबत कळविले आहे. उर्वरित एका प्रस्तावातील इमारतीचे बांधकामाची खोली मेट्रोच्या भूमिगत बोगद्याच्या वर येत असून जमीन पातळीपासून पायाची खोली अनुज्ञेय खोलीपेक्षा जास्त असल्याने आरसीसी तज्ञ तसेच भूतांत्रिक सल्लागार यांच्या सल्ल्याने प्रस्तावात सुधारणा करण्याबाबत संबंधित विकासक व वास्तुविशारद यांना दिनांक २८/०८/२०२३ रोजी कळविले आहे. तथापि, अद्याप सुधारीत प्रस्ताव महानगरपालिकेला प्राप्त झाले नसल्याने उक्त २ प्रस्तावांना मंजुरी देण्यात आलेली नाही.

ठाणे अंतर्गत रिंग मेट्रो मार्गिकेचे रेखांकन निश्चित करण्यापूर्वी महामेट्रोद्वारे रेल्वे यार्डच्या खालून व रेल्वे लाईनच्या बाजूने संरेखन करण्याबाबतचा पर्यायबाबतचा देखील अभ्यास केला परंतु हे पर्याय रेल्वे स्टेशनचे विस्तारीकरण, रेल्वेमार्फत मिळणारी ना-हरकत, मेट्रो स्टेशनच्या बांधकामांसाठी तांत्रिक दृष्ट्या व्यवहार्य नव्हते.

सद्य:स्थितीत एमएमआरडीएने हाती घेतलेल्या प्रकल्पांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. महामेट्रोला देखील नागपूर, पुणे, नवी मुंबई येथे मेट्रो प्रकल्प उभारण्याचा अनुभव आहे. त्यापैकी नागपूर मेट्रो टप्पा -१ व नवी मुंबई मेट्रोचे काम पूर्ण आणि पुणे मेट्रो रेल्वे टप्पा-१ चे काम अंतिम टप्प्यात आहे. सद्यास्थितीत प्रस्ताव केंद्र शासनाच्या विचाराधीन असल्याने या टप्प्यावर प्रकल्प अंमलबजावणी संस्था बदलणे उचित होणार नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या सॅडहर्स्ट रोड (मुंबई) येथील अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या वास्तव्याच्या इमारतीची पुनर्बांधणी करण्याबाबत

**(३२) * २२५२१ श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.प्रवीण दटके, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या सॅडहर्स्ट रोड (मुंबई) येथील अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या वास्तव्याची इमारत जीर्ण होऊन मोडकळीस आल्याने इमारत कधीही कोसळण्याची शक्यता निर्माण झाली असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे काय,

(२) असल्यास, या सहा मजली इमारतीत ४४ खोल्या असून या इमारतीला सुमारे ६० वर्षाचा कालावधी झाल्याने सदर इमारतीचे त्वरीत स्ट्रक्चरल ऑडिट करणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, येथील रहिवाशांची नवीन इमारतीत राहण्याची व्यवस्था करुन या ठिकाणी नव्याने भव्य उभारलेल्या इमारतीत येथे राहणाऱ्या कर्मचाऱ्यांना सदनिका देऊन उर्वरित सदनिका राज्य मार्ग परिवहन अधिकारी/ कर्मचाऱ्यांना देण्यात याव्यात अशी मागणी राज्य मार्ग परिवहन महामंडळातील कर्मचाऱ्यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सॅडहर्स्ट रोड येथील राज्य मार्ग परिवहन महामंडळातील कर्मचाऱ्यांच्या इमारतीची पुर्नबांधणी करुन कर्मचाऱ्यांना सदनिका वाटप करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) होय.

(३) नाही.

(४) व (५) इंडियन इंस्टिट्यूट ऑफ टेक्नोलॉजी, मुंबई यांचेकडून रा.प.चिंचबंदर कर्मचारी वसाहतीचे संरक्षणात्मक परिक्षण करण्यात येत आहे.

-----------------

## वरळी (मुंबई) येथील माता रमाबाई आंबेडकर स्मशानभूमीच्या सुशोभिकरणाचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(३३) * २११२२ श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरळी (मुंबई) येथील माता रमाबाई आंबेडकर स्मशानभूमीच्या सुशोभिकरणाचे काम गत अडीच वर्षांपासून प्रलंबित असल्याने मृतदेहांवर अंत्यसंस्कार करण्यासाठी नागरिकांना प्रतिक्षा करावी लागत असल्याची बाब दिनांक १२ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू स्मशानभूमीत जाणाऱ्या रस्त्याचीही अत्यंत दयनीय अवस्था झाली असून स्मशानभूमीच्या सुशोभिकरणाचे काम अपूर्णावस्थेत असल्याने मृतदेह जळताना धूर कोंडत असल्याने नागरिकांची प्रचंड गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन वरळी (मुंबई) येथील माता रमाबाई आंबेडकर स्मशानभूमीतील गैरसोयी दूर करण्याबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२) व (३) वरळी (मुंबई) येथील माता रमाबाई आंबेडकर स्मशानभूमीमध्ये सध्या २ पारंपारिक पध्दतीचे पायर्स व १ विद्युतदाहिनी कार्यरत असून दिवसाला अंदाजे ४ ते ५ मृतदेहांवर अंत्यसंस्कार केले जातात. त्यानुसार मृतदेहाच्या दहनासाठी आवश्यक त्या सुविधा सदर ठिकाणी पुरविण्यात येतात.

तसेच वरळी (मुंबई) येथील माता रमाबाई आंबेडकर स्मशानभूमीतील अंतर्गत रस्त्याचे काम पूर्ण झाले आहे. सदर स्मशानभुमीच्या सुशोभिकरणाच्या कामाचे अंदाजपत्रक तयार झाले असून निविदा प्रकियेचे काम हाती घेण्यात आले आहे.

त्याचप्रमाणे मृतदेह जळताना होणारा धूर खेचून घेण्याऱ्या चिमणीमध्ये झालेल्या बिघाडाच्या दुरूस्तीचे काम बृहन्मुंबई महापालिकेमार्फत दिनांक १५/१०/२०२३ पासून हाती घेण्यात आले असून सदर काम ५०% पूर्ण झाले आहे.

मे. हिरालाल पारेख परिवार ट्रस्ट यांनी व्यावसायिक सामाजिक जबाबदारी (CSR) अंतर्गत महानगरपालिकेसोबत झालेल्या करारामध्ये वरळी स्मशानभूमीची काही कामे अपुऱ्या निधीच्या कारणास्तव पार पाडण्यास असमर्थता दर्शविली आहे.

सदर स्मशानभूमीमध्ये आवश्यक असलेली अतिरिक्त विकासकामे (करारनाम्यात समाविष्ट नसलेली) महानगरपालिकेमार्फत करण्यात येणार आहेत. यासंदर्भातील अंदाजपत्रक तयार करण्यात आले

असून संबंधित आर्थिक तरतूद बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत तातडीने उपलब्ध करुन देण्याची प्रक्रिया करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर शहरातील अतिवृष्टीमधील नुकसानग्रस्तांना भरपाई मिळण्याबाबत

**(३४) * २१३४२ श्री.अभिजित वंजारी, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरातील नदी-नाल्यावरींल पूरसंरक्षक भिंती जीर्ण अवस्थेत असून नदी नाले अनेक ठिकाणी एकमेकांना जोडले नसल्यामुळे नदी वगळता शहरात साचणारे पाणी एकत्रितपणे बाहेर पडण्याची सोय नसल्यामुळे माहे सप्टेंबर,२०२३ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे बहुतांश घरात पाणी शिरल्यामुळे स्थानिक प्रशासनाने नागपूर शहराचा विकास करताना नागपूर महानगरपालिकेने पाण्याचा निचरा होण्यासाठी कोणतीच उपाययोजना केली नसल्याची बाब निदर्शनास आली असून यावर कायमस्वरुपी तोडगा काढण्याच्या दृष्टीने महानगरपालिका आयुक्त व प्रशासक यांनी आरोग्य अभियांत्रिकी विभागाला याचा अभ्यास करुन यावर कायमस्वरुपी तोडगा काढण्याचे आदेश दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर महानगरपालिकेने नुकसानग्रस्त घरांचे पंचनामे केले आहेत काय, असल्यास, शासनाने घोषणा केलेल्या प्रत्येक कुटूंबाला नुकसान भरपाई स्वरुपात रुपये १० हजार एवढी मदत किती कुटुंबाना अदा करण्यात आली आहे, किती कुटुंबियांना मदत मिळणे प्रलंबित आहे,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नागपूर शहरातील अतिवृष्टीमुळे होणारे नुकसान टाळण्याकरीता पाण्याचा निचरा होण्यासाठी उपाययोजना करावी तसेच सदर अतिवृष्टीतील बाधित कुटुंबियांना तातडीने नुकसान भरपाई मिळावी, यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे, नागपूर शहरात दिनांक २३ सप्टेंबर, २०२३ रोजी चार तासात ढगफुटीसदृश साधारत: ११२ मी.मी. पाऊस झाल्याने, नाग नदी, पिवळी नदी व पोहरा नदीच्या भिंती त्याचप्रमाणे नाल्याच्या भिंती क्षतीग्रस्त होवून लगतच्या परिसरात पावसाचे पाणी शिरल्याने, मोठ्या प्रमाणात मूलभूत सुविधांचे नुकसान झाले.

नाग नदीला निर्माण झालेल्या पूरपरिस्थितीबाबत कायमस्वरुपी तोडगा काढण्याकरीता अंबाझरी मातीच्या धरणाचे बळकटीकरण व ओव्हर फ्लो वीअर मध्ये नियंत्रीत विसर्ग करण्यासंबंधीची व्यवस्था करण्यासंदर्भात पाटबंधारे विभागाशी संपर्क साधून यावर अभ्यास करुन उपाययोजना करण्यासंबंधीचे निर्देश आयुक्त व प्रशासक यांनी आरोग्य अभियांत्रिकी विभागाला दिले आहे.

(२) व (३) माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये नागपूर शहरात अतिवृष्टीमुळे झालेल्या मालमत्तेच्या नुकसानीचे पंचनामे करण्यासाठी महसूल विभाग व नागपूर महानगरपालिकेचे अधिकारी व कर्मचारी यांची पथके तयार करुन पंचनामे करण्यात आले.

पुराचे पाणी घरात गेल्यामुळे घरातील कपड्यांच्या व भांड्यांच्या झालेल्या नुकसानीकरीता एकूण २४,४९५ कुटुंबाना प्रत्येकी रुपये १०,०००/- प्रमाणे एकूण रुपये २४४९.५० लाख इतके सानुग्रह अनुदान संबंधीतांच्या बँक खात्यात वितरीत करण्यात आलेले आहे. उर्वरित ३५०२ बाधित कुटुंबाना प्रत्येकी रुपये

१०,०००/- सानुग्रह अनुदान वितरणाची कार्यवाही सुरु आहे.

शहरातील अतिवृष्टीमुळे होणारे नुकसान टाळण्याच्या दृष्टीने, आपत्ती सौम्यीकरणा अंतर्गत नदी व नाल्यावर आवश्यक ठिकाणी संरक्षण भिंत, पुल व खोलीकरण इ. संरक्षणात्मक उपाययोजना करण्याकरीता व राज्य आपत्ती प्रतिसाद निधीकरीता जिल्हाधिकारी यांच्याकडून सादर करण्यात आलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने राज्य शासनाने दिनांक ३० नोव्हेंबर, २०२३ च्या शासन निर्णयान्वये रुपये ८३८.५४ लक्ष इतका निधी वितरित करण्यास मंजूरी दिली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सामाजिक न्याय विभागाच्या अखत्यारितील वसतिगृहांना प्रलंबित अनुदान मिळण्याबाबत

**(३५) * २१२८८ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी, श्री.अरुण लाड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या अखत्यारितीतील २,५०० अनुदानित वसतिगृहांना माहे जुलै, २०२३ पासून अनुदान न मिळाल्यामुळे इमारत भाडे, कर्मचाऱ्यांचे मानधन तसेच या वसतिगृहात शिक्षण घेणाऱ्या १ लाखांपेक्षा अधिक विद्यार्थ्यांच्या भोजनाचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, छत्रपती संभाजीनगर शहरात सामाजिक न्याय विभागाची ११ वसतिगृहे आहेत त्यापैकी ७ वसतिगृहे मुलांची व ४ वसतिगृहे मुलींची असून, वसतिगृहात १००० मुले तर ६०० मुली राहत असून वसतिगृहातील विद्यार्थ्यांना वेळेवर निर्वाह भत्ता, स्टेशनरी व ड्रेस कोडचे पैसे मिळत नसून निकृष्ट दर्जाचे भोजन मिळत असल्याच्या तक्रारीही विद्यार्थ्यांनी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ११ वसतिगृहांपैकी ३ वसतिगृहे ही भाड्याच्या इमारतीत असून तेथे भोजन व इतर अनेक भौतिक सोई सुविधांचा अभाव असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन वसतिगृहातील विद्यार्थ्यांच्या भोजन व इतर उद्भवणाऱ्या भौतिक समस्यांचे निराकरण करण्याकरीता सदर वसतिगृहांना प्रलंबित असलेले अनुदान अदा करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) नाही.

(२) अंशत: खरे आहे.

विभागांतर्गत शासकीय वसतिगृहातील विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता, स्टेशनरी, ड्रेसकोड यासाठी देय असणारी माहे जानेवारी, २०२३ पर्यंतची रक्कम अदा करण्यात आलेली असून उर्वरित देय रक्कम तात्काळ अदा करण्याबाबत विभागामार्फत कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) नाही.

(४) सदर वसतिगृहांचे प्रलंबित अनुदान तात्काळ अदा करण्याबाबत विभागामार्फत कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील वाहनधारक परवाना आणि वाहन नोंदणी प्रमाणपत्राचे नवीन स्मार्ट कार्ड उपलब्ध करुन देण्याबाबत

**(३६) * २१६५९ श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्री.रमेश कराड, श्री.प्रवीण दटके, श्रीमती उमा खापरे, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील प्रादेशिक परिवहन कार्यालयात दरमहा वीस हजारांपेक्षा अधिक वाहनधारक परवान्यासाठी परीक्षा देतात त्यात मुंबई, पुणे या शहरातील वाहनधारकांची संख्या अधिक असून त्याना एका महिन्यात स्मार्ट कार्ड देणे बंधनकारक असतानाही साध्या कागदावर परवाना दिला जात असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परवान्याची मुदत कालबाह्य होऊनही स्मार्ट कार्ड मिळत नसल्याने वाहनचालकांना पोलीसांकडून दंडात्मक कारवाईला सामोरे जावे लागत असल्याची बाब दिनांक १४ सप्टेंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील वाहनचालकांना परवान्यांच्या व वाहननोंदणीच्या स्मार्ट कार्डसाठी प्रतीक्षेत ठेवणाऱ्या कंपनीवर कारवाई करुन नवीन स्मार्ट कार्ड लवकरात लवकर उपलब्ध व्हावीत यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) नाही.

उप प्रादेशिक / प्रादेशिक परिवहन कार्यालयातून अनुज्ञप्तीचे अर्जास अंतिम मान्यता दिल्यानंतर अर्जदार स्वत:ची अनुज्ञप्ती केंद्र शासनाच्या डिजी लॉकर या ॲपमध्ये डाऊनलोड करु शकतो व सदर अनुज्ञप्ती सर्व अंमलबजावणी पथकामार्फत ग्राहय धरण्यात येते.

(३) सद्य:स्थितीत नोंदणी प्रमाणपत्र छपाई व अनुज्ञप्ती छपाई करण्याकरीता द एमसीटी कार्ड ॲण्ड टेक्नोलॉजी प्रा.लि. या कंपनीची निवड करण्यात आली असून त्यांचेमार्फत प्रलंबित असलेले नोंदणी प्रमाणपत्र व अनुज्ञप्ती छपाई पूर्ण करुन नागरीकांना पोष्टाव्दारे पाठविण्यात आली आहे. आता, नोंदणी प्रमाणपत्र व अनुज्ञप्ती छपाईचे काम दैनंदिनीवर करण्यात येत आहे. उशिराने अनुज्ञप्ती छपाई केल्याबाबत जुने सेवा पुरवठादार यांच्याकडून खुलासा मागविण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेने बांधकाम व्यावसायिक आणि विकासकांना शुल्कात दिलेल्या सवलतीच्या निर्णयाचे पुनर्विलोकन करण्याबाबत

**(३७) * २११८६ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील ५३ बांधकाम व्यावसायिक आणि विकासक यांनी महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियमानुसार नोंदणी करणे आवश्यक असताना सदर व्यावसायिकांनी नोंदणी केली

नसल्याची बाब भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१८ च्या अहवालातून निदर्शनास आली असून नोंदणी न केल्यामुळे शासनाचा निधी अखर्चित राहिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई शहरात समूह विकास योजनेद्वारे (क्लस्टर) पुनर्विकासाला चालना देण्यासाठी फंजिबल चटई क्षेत्र निर्देशकांचे अधिमूल्य (प्रीमियम), तसेच विकास शुल्कात विकासकांना दिनांक १४ जून, २०२४ रोजीपर्यंत अजून एका वर्षासाठी ५० टक्के सवलत देण्याचा निर्णय बृहन्मुंबई महानगरपालिकेने दिनांक ५ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २०२० च्या कोरोना काळापासून बृहन्मुंबई महानगरपालिकेने सलग चार वर्षे विकासकांना दिलेल्या सवलतींमुळे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सुमारे आठ हजार कोटी रुपयांच्या महसुलाचे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू सवलतींमुळे बृहन्मुंबई महानगरपालिकेवर आर्थिक बोजा येणार असल्याचे मत महानगरपालिका प्रशासनाने प्रस्तावात नोंदविलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या उक्त निर्णयाची पडताळणी शासनाने केली आहे काय, तदनुषंगाने सदरहू निर्णयाचे पुनर्विलोकन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) कॅग रिपोर्ट २०१७-१८ ची दुसरी पुनर्विचारणा पॅरा-२/०४/१ / प्रकरणातील वॅट / जीएसटी कायद्यांतर्गत अनोंदीत व्यापारी या विषयाच्या अनुषंगाने राज्यकर आयुक्तालय यांचेद्वारे विचारणा करण्यात आलेल्या विषयाच्या अनुषंगाने संबंधित व्यापाऱ्याचे नाव, कार्यालय व घरचा पत्ता, दूरध्वनी क्रमांक इत्यादी माहिती बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी दिनांक २४/११/२०२३ रोजी सादर केली आहे.

भारताचे नियंत्रक व महालेखापाल यांनी त्यांच्या २०१८ च्या अहवालात नमूद केलेल्या ५३ पैकी ३७ व्यापारी महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियमांतर्गत नोंदीत झालेले असून, ५ व्यापारी हे नोंदणीस पात्र नाहीत. उर्वरित ११ प्रकरणांमध्ये अनोंदीत कालावधीसाठीची कार्यवाही वित्त विभागामार्फत सुरु आहे.

(२) महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम १५४ अन्वये दिनांक १५/०६/२०२३ जारी निर्देशात नमूद केलेल्या कालावधीकरीता म्हणजेच दिनांक १४/०६/२०२४ पर्यंत प्रत्यक्ष जमा करण्यात येणाऱ्या अधिमुल्याच्या प्रस्तावात नमूद बाबींकरीता सवलत लागू राहील असे प्रशासक (स्थायी समिती) ह्यांचा दिनांक १४/०९/२०२३ चा ठराव क्र.११११ व प्रशासक (महानगरपालिका) ह्यांचा दिनांक १५/०९/२०२३ चा ठराव क्र.६३७ अन्वये मंजूर केले आहे.

(३) हे खरे नाही, तथापि, कोरोना काळातील सन २०२०-२१ च्या रूपये २१०७.३६ कोटी महसूलाच्या तुलनेत, प्रमुख अभियंता (विकास नियोजन) खात्यास प्रामुख्याने सदर सवलत दिल्यामुळे सन २०२१-२२ करीता रुपये १५४९३.६३ कोटी रूपयांचे उत्पन्न प्राप्त झाले आहे.

(४) व (५) उक्त सवलती दिल्यामुळे महापालिकेचे आर्थिक नुकसान होईल असे अभिप्राय प्रमुख लेखापाल, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी त्यांच्या अहवालात नमूद केले आहे. तथापि, तसे न होता, महापालिकेस रुपये १५४९३.६३ कोटी रूपयांचे उत्पन्न प्राप्त झाले आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील मोटार वाहने अपघात दावे प्राधिकरणातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(३८) * २१४८५ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत मोटार वाहने अपघात दावे प्राधिकरणातील ८ न्यायालयांपैकी २ न्यायालयात सन २०१९ पासून न्यायाधीश नसून कर्मचाऱ्यांच्या एकूण १२४ पदांपैकी ७७ पदे रिक्त असून न्यायाधिकरणात जवळपास दहा हजार प्रकरणे प्रलंबित असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कर्मचाऱ्यांच्या कमतरतेमुळे प्रकरणे सुनावणीस येण्यास अडचण निर्माण होणे, ई-कोर्ट पोर्टलवर नियमित सुनावणीचे रोजनामे अपलोड न होणे, आदेशांच्या प्रती तातडीने मिळण्यासाठी अडचणी येणे, लघुलेखक पुरेसे नसल्याने न्यायालयाचे निर्णय प्रलंबित असणे, विशिष्ट कामे नेमून दिलेल्या कर्मचाऱ्यांना वेळोवेळी वेगवेगळी कामे करावयास सांगणे यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने न्यायाधीकरणातील प्रलंबित प्रकरणे मार्गी लावण्याकरीता कर्मचाऱ्यांची व न्यायाधीशांची रिक्त पदे कालबध्द पध्दतीने भरण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) मोटार अपघात दावा न्यायाधिकरण, मुंबई येथील न्यायाधिकरणात सद्य:स्थितीत आठही न्यायाधीश कार्यरत आहेत. कर्मचाऱ्यांच्या एकूण १२४ पदांपैकी ५० पदे सद्य:स्थितीत रिक्त आहेत. न्यायाधिकरणात आजपर्यंत जवळपास आठ हजार प्रकरणे प्रलंबित आहेत.

(२) व (३) मोटार अपघात दावा न्यायाधिकरण, मुंबई मध्ये उपलब्ध असलेल्या कर्मचाऱ्यांकडून दैनंदिन न्यायालयीन व प्रशासकीय कामकाज करून घेण्यात येत आहे.

बाह्ययंत्रणेमार्फत रिक्त पदांपैकी विविध संवर्गातील पदे भरण्यासंदर्भात कार्यवाही सुरु करण्यात आली होती. परंतु बाह्ययंत्रणेकडून कामे करून घेण्याबाबतचा शासन निर्णय रद्द करण्यात आला असल्यामुळे सदर रिक्त पदे बाह्ययंत्रणेमार्फत भरण्याबाबत निर्बंध आले आहेत.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कार्यकक्षेतील तसेच अनुकंपा तत्वावरील पदे भरणेबाबत कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेतील सफाई कामगार, मुकादम व अन्य रिक्त पदे भरण्याबाबत

**(३९) * २१११५ श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील सफाई कामगारांची, मुकादमांची चार हजारांहून अधिक रिक्त पदे गत १० वर्षांत भरण्यात आली नसून बृहन्मुंबई महानगरपालिकेने केवळ कंत्राटी कामगारांच्या भरतीवर भर दिला असल्याने कार्यरत असलेल्या कायमस्वरूपी सफाई कामगारांवर कामाचा अतिरिक्त ताण पडत असल्याची बाब दिनांक १५ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईत दिवसेंदिवस वाढत असलेल्या लोकसंख्येच्या प्रमाणात कचऱ्याचे प्रमाण देखील वाढत असल्याने सफाई कामगारांचे उपलब्ध असलेले मनुष्यबळ कमी पडत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिकेतील सफाई कामगार, मुकादम व अन्य रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या घन कचरा व्यवस्थापन विभागात सफाई कामगारांची एकूण २७,९०० मंजूर पदे असून त्यापैकी २५,२५२ इतकी पदे कार्यरत आहेत. तसेच, सफाई कामगारांची पदे वारसाहक्क नियमावलीनुसार भरली जातात.

सदर विभागात २३१२ मुकादमांची मंजूर पदे आहेत व त्यामधील १८६८ पदे भरलेली आहेत, उर्वरीत ४४४ रिक्त पदे भरण्याची कार्यवाही पदोन्नती समितीच्या शिफारशीनुसार करण्याचे प्रस्ताविले आहे.

सफाईचे काम करण्याकरीता आधुनिकीकरण करुन यांत्रिक झाडू प्रणालीनुसार साफसफाईची कामे केली जात आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ठाणे शहरातील अनधिकृत बांधकामांबाबत चौकशी अहवालाच्या नस्ती आणि कारवाई संदर्भातील ठराव गहाळ झाल्याबाबत

**(४०) * २१९६६ ॲड.अनिल परब, श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाण्यातील अनधिकृत बांधकामांबाबत तत्कालीन ठाणे महानगरपालिका आयुक्त यांच्या कार्यकाळात तयार करण्यात आलेल्या चौकशी अहवालाच्या नस्ती आणि कारवाई संदर्भातील ठराव गहाळ झाले असल्याची बाब दिनांक १३ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ठाणे शहरातील अनधिकृत बांधकामांसंदर्भात सुमारे १४ विद्यमान, माजी सहाय्यक आयुक्तांची चौकशी सुरू करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने ठाणे शहरातील अनधिकृत बांधकामांबाबत चौकशी अहवालाच्या नस्ती आणि कारवाई संदर्भातील ठराव गहाळ झाल्याच्या प्रकरणी संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२) व (३) सदरची नस्ती ठाणे महानगरपालिकेकडे उपलब्ध असल्याचे ठाणे महानगरपालिकेने कळविले आहे.

सदर प्रकरणी ठाणे महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील ५ अधिकाऱ्यांची विभागीय चौकशी महानगरपालिकेच्या स्तरावर सुरू असून प्रतिनियुक्तीवरील ९ अधिकाऱ्यांसंदर्भात शासन स्तरावर कार्यवाही करण्यात येत आहे ही वस्तुस्थिती आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## दिघंची (ता.आटपाडी, जि.सांगली) येथे सुसज्ज बस स्थानक उभारण्याबाबत

**(४१) * २१३८३ श्री.गोपिचंद पडळकर, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिघंची (ता.आटपाडी, जि.सांगली) या गावाला सुसज्ज बस स्थानक नसल्याने या ठिकाणी नवीन बस स्थानक बांधण्याची मागणी ग्रामस्थांनी वारंवार प्रशासनाला निवेदनाद्वारे केली असून उपोषणाचाही इशारा दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिघंची हे गाव आटपाडी तालुक्यातील सर्वात मोठे गाव असून बसस्थानकाविना तेथील प्रवाशांची, विद्यार्थ्यांची, नागरिकांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दिंघचीतील बस स्थानकाची प्रचंड प्रमाणात झालेली दुरवस्था पहाता प्रशासन व राज्य मार्ग परिवहन महामंडळाने समन्वय साधून बस स्थानकासाठी नवीन इमारत उभारण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय.

(२), (३) व (४) होय.

मौ. दिघंची, ता. आटपाडी येथे राज्य परिवहन महामंडळाची मालकीची जागा नाही. सार्वजनिक बांधकाम विभागाकडून प्रवाशांकरीता निवारा शेड बांधण्यात आला होता.परंतु, राज्य मार्ग १४३ चे रुंदीकरणाच्या वेळीस सदरचा निवारा सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत काढण्यात आला व सदर निवारा शेड रस्ता रुंदीकरणानंतर नवीन बांधुन देणे संदर्भात विभाग नियंत्रक, सांगली हे उपविभागीय अभियंता, सा.बां.उपविभाग पंढरपूर यांचेकडे पाठपूरावा करीत आहेत. तसेच ग्रामपंचायत दिघंची, मा.मुख्य कार्यकारी अभियंता, जि.सांगली, मा.कार्यकारी अभियंता, बांधकाम जि.प. सांगली, मा.जिल्हाधिकारी सांगली यांचेकडे निधी उपलब्धतेसाठी विभाग नियंत्रक, सांगली हे पाठपूरावा करीत आहेत.

-----------------

## राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या अमरावती आगारातील निलंबित अधिकारी/कर्मचाऱ्यांची चौकशी करण्याबाबत

**(४२) * २२३१९ श्री.रामदास आंबटकर, श्रीमती उमा खापरे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या अमरावती आगारात सन २०१९ ते २०२२ च्या कालावधीत तिकीट साठ्यांमध्ये तफावत आढळून आल्याने विभाग नियंत्रकांनी चौकशीचे आदेश दिल्यानंतर याबाबतचा प्राथमिक चौकशी अहवाल विभागीय वाहतूक व लेखा अधिकारी यांनी आगार व्यवस्थापकांना सादर केला असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्राथमिक चौकशी अहवालानुसार तिकीट साठा अद्ययावत न ठेवता या कामात हलगर्जीपणा केल्याप्रकरणी सहायक वाहतूक अधिकारी, तत्कालीन आगार लेखापाल यांच्यासह सहा लिपिक व तीन वाहतूक नियंत्रक अशा अमरावती आगारातील ११ अधिकारी व कर्मचारी यांना राज्य मार्ग परिवहन महामंडळाने निलंबित केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या अहवालानुसार राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या सर्व आगाराची सन २०१९ ते २०२२ च्या कालावधीतील तिकीट साठ्याची चौकशी करण्याबाबत तसेच अमरावती विभागातील निलंबित अधिकाऱ्यांच्या अंतिम चौकशीनंतर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) होय.

अमरावती १ आगारातील तिकीट साठ्यामध्ये तफावत आढळून आली. त्या अनुषंगाने तिकिट साठ्यामध्ये अनियमितता आढळून आल्याबद्दल अमरावती १ आगारातील जबाबदार एकूण ११ पर्यवेक्षक व कर्मचारी यांना रा.प.शिस्त व आवेदन कार्यपध्दतीनुसार निलंबित करुन नियमीत आरोपपत्र देण्यात आले आहे व खातेनिहाय प्रमादीय कारवाई सुरु आहे. त्याचप्रमाणे पोलीस स्टेशन सिटी कोतवाली, अमरावती येथे गुन्हा दाखल करण्याबाबत तक्रार करण्यात आली आहे.
(३) व (४) सदर प्रकरणी व ईटीआयएम व ओआरएस प्रणाली बाबत सखोल चौकशी करण्याबाबत सुचना देण्यात आल्या आहेत.

-----------------

## राज्यातील समतादुतांचे समाज कल्याण विभागामध्ये समायोजन करण्याबाबत

**(४३) * २२०६७ श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.अनिकेत तटकरे, श्री.सतिश चव्हाण, श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था बार्टी, पुणे अंतर्गत समतादुत हे गत आठ वर्षांपासून अनुसूचित समाजातील वंचित घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी काम करत असून तालुका स्तरावर सामाजिक न्याय विभागाचे कार्यालय कार्यरत नसल्याने समतादुत सामाजिक न्याय विभागाच्या योजना गाव व तालुका स्तरावर प्रभावीपणे राबविण्याचे काम करत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, समतादुतांचे समाज कल्याण विभागामध्ये समायोजन करणेबाबत ११४ पानी स्वयंस्पष्ट अहवाल "बार्टी" च्या महासंचालकांना सादर केला होता, परंतु अद्याप त्यावर निर्णय झाला नसल्याची बाब दिनांक १९ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सन २०१४ मध्ये सुमारे साडेतीनशे समतादुतांची नेमणूक करण्यात येऊन त्यांना महसूल विभागात सामावून घेण्यात येईल, असे आश्वासन शासनाकडून देण्यात आले असून त्याकरीता एका खाजगी कंपनीची नेमणूक करुन सर्व समतादुतांना कंत्राटी स्वरुपात दाखविण्यात आले असल्याचे दिनांक २२ ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, अनुसूचित जातीतील वंचित उपेक्षित गरजु लाभार्थ्यांना याचा लाभ मिळून शासन आपल्या दारी संकल्पना खऱ्या अर्थाने पूर्ण होण्याच्यादृष्टीने शासन सेवेतील गट 'क' प्रवर्गात समतादूतांचा समावेश करण्यासाठी व प्रलंबित मागण्याबाबत सर्व समतादुतानी पुणे ते मुंबई पायी लॉंग मार्च दिनांक ९ ऑगस्ट ते १७ ऑगस्ट, २०२३ दरम्यान काढण्यात आला होता, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन समतादुतांचे समाज कल्याण विभागात समायोजन करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) बार्टीच्या दिनांक ५/०७/२०१४ च्या नियामक मंडळाच्या आठव्या बैठकीमधील विषय क्र.२० नुसार या समतादूत पथदर्शी प्रकल्पास मान्यता देण्यात आली असून बार्टीच्या नियामक मंडळाच्या १६ व्या बैठकीतील निर्णयानुसार सर्व समतादुतांच्या सेवा या बाह्यस्त्रोताद्वारे उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत.

(४) हे खरे आहे.

(५) समतादूतांच्या सेवा ह्या बाह्यस्त्रोताद्वारे उपलब्ध करण्यात आल्या असून त्यांना समाज कल्याण विभागात समायोजन करण्याची कोणतीही बाब विचाराधीन नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सातारा येथील मातोश्री वृद्धाश्रमातील अपूर्ण इमारतींची दुरूस्ती करुन सदर आश्रम पुन्हा सुरु करणेबाबत

**(४४) * २१३१७ श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या सामाजिक न्याय विभागाने दिनांक ७ ऑक्टोबर, २००६ रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार जिल्हाधिकारी, सातारा व समाजकल्याण अधिकारी, सातारा यांनी सातारा येथील बंद पडलेला मातोश्री वृध्दासेवाश्रमाचा ताबा कायम विनाअनुदान तत्वावर चालविण्यासाठी वृध्दासेवाश्रम, सांगली या संस्थेस दिला असून अपूर्ण असलेल्या सर्व इमारतींची दुरूस्ती करण्याची अट घातली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वृध्दसेवाश्रमात १०० हून अधिक ज्येष्ठ नागरिक सेवा घेत असून सातारा येथील मातोश्री वृध्दसेवाश्रम हा वृध्दासेवाश्रम, सांगली यांच्याकडे हस्तांतरित करण्याच्या मागणीस ज्येष्ठ नागरीकांनी विरोध दर्शविला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सातारा येथील बंद पडलेल्या मातोश्री वृद्धासेवाश्रमातील अपूर्ण असलेल्या सर्व इमारतींची दुरूस्ती करुन सदर आश्रम पुन्हा सुरु करण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेने वरळी व बोरिवली येथील हायड्रोलिक पार्किंगसाठी काढलेल्या निविदा प्रक्रियेत गैरव्यवहार झाल्याबाबत

**(४५) * २१७५८ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पार्किंगची समस्या दूर करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेने हायड्रोलिक पार्किंग योजनेंतर्गत वरळी व बोरिवली येथील हायड्रोलिक पार्किंगसाठी महानगरपालिकेने काढलेल्या निविदा प्रक्रियेत रुपये १०० ते १२५ कोटींच्या झालेल्या अनियमिततेप्रकरणी चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिकेचे उपायुक्त (पायाभूत सुविधा) यांच्याकडून याबाबत माहिती मिळाली नसून यापूर्वी महानगरपालिकेने माटुंगा येथे हायड्रोलिक पार्किंगसाठी मंजुरी देण्यात आलेली निविदा तीन टक्के कमी दराने होती मात्र वरळी व बोरिवली येथे ३५ टक्के वाढीव निविदा देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सुमारे ५५० कार पार्किंगसाठी रुपये १६५ कोटींची निविदा काढण्यात आली असून त्यासाठी महानगरपालिका रुपये २१९ कोटी देणार असून ही रक्कम नियोजित खर्चाच्या सुमारे ५५ कोटी अधिक असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने हायड्रोलिक पार्किंग निविदा प्रक्रियेत झालेल्या रुपये १२५ कोटींच्या गैरव्यवहाराबाबत संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

बृहन्मुंबई महानगरपालिकेने वरळी येथील महानगरपालिका अभियांत्रिकी केंद्राजवळ बहुस्तरीय यांत्रिकी वाहनतळाकरीता निविदा मागविली होती. परंतु सदर निविदेमध्ये लघुत्तम निविदाकाराने सादर केलेले देकार हे व्यवहार्य नसल्याने अस्विकाराहार्य होते. त्यामुळे वरळी येथील प्रकल्पाची निविदा दिनांक २३/१०/२०२३ रोजी महानगरपालिकेने रद्द केली आहे.

बोरीवली येथे बहुस्तरीय यांत्रिकी वाहनतळ प्रस्तावित नाही.

(२) हे खरे नाही.

मा.लोकप्रतिनिधी यांचेकडून उपायुक्त (पायाभूत सुविधा) यांच्याकडे सदर निविदेच्या अनुषंगाने माहितीची विचारणा झाल्याचे दिसून येत नाही, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत माटुंगा (पू) येथील सेंट्रल माटुंगा रेल्वे स्थानकासमोरील जागेवर बहुस्तरीय यांत्रिकी वाहनतळाच्या कामाकरीता (-)२.५३% इतक्या कमी दराने निविदा मंजूर करण्यात आली आहे.

वरळी येथील प्रकल्पाची निविदा दिनांक २३/१०/२०२३ रोजी बृहन्मुंबई महानगरपालिकेने रद्द केली आहे.

बोरीवली येथे बहुस्तरीय यांत्रिकी वाहनतळ प्रस्तावित नाही.

(३) हे खरे नाही.

वरळी येथील महानगरपालिका अभियांत्रिकी केंद्राजवळील निविदेमध्ये ६४० चार चाकी व ११२ दुचाकी वाहनांकरीता बहुस्तरीय यांत्रिकी वाहनतळ आणि त्याचे बांधकाम पूर्ण झाल्यावर २० वर्षापर्यंत प्रकल्पाच्या कार्यान्वीकरण, देखभाल व स्वच्छता कार्य या कामांचा समावेश होता. सदर निविदेचा कार्यालयीन अंदाज रुपये १६५.५१ कोटी इतका होता.

परंतु, सदर निविदा दिनांक २३/१०/२०२३ रोजी बृहन्मुंबई महानगरपालिकेने रद्द केली आहे.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या धोकादायक वसाहतीत राहणाऱ्या कामगारांकरीता संक्रमण शिबीरे उभारण्याबाबत

**(४६) * २१३९९ श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, डॉ.प्रज्ञा सातव, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्री.प्रविण पोटे-पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेने सफाई कामगारांच्या धोकादायक वसाहती रिकाम्या करण्यास सुरुवात केल्यामुळे दिनांक ३१ ऑगस्ट, २०२३ रोजीपर्यंत अनेक सफाई कर्मचाऱ्यांना वसाहतीमधील घरे रिकामी करावी लागणार असून येथील कामगारांना विस्थापन भत्त्यापोटी रुपये १४ हजार आणि मूळ वेतनाच्या २० टक्के घरभाडे देण्याची तयारी प्रशासनाने दर्शविल्यामुळे सफाई कामगारांना पर्यायी घर शोधावे लागणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दक्षिण मुंबईतील वसाहतीत राहणाऱ्या कामगारांना याच परिसरात रुपये १४ हजारांमध्ये भाड्याची घरे उपलब्ध नसून यासंदर्भात शासनाने माहिती व निर्णय घेवून येथे राहणाऱ्या कामगारांना याच परिसरात मोकळया जागेत संक्रमण शिबिरे उभारुन त्यांच्या निवासाची व्यवस्था करणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मुंबई व ठाणे येथे महानगरपालिकेच्या वसाहतीत राहणाऱ्या कामगारांना याच परिसरात मोकळया जागेत संक्रमण शिबिरे उभारुन त्यांच्या निवासाची व्यवस्था करण्याबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.

रुपये ७५,०००/- भाडे ठेव व रुपये १४,०००/- विस्थापन भत्ता आधिक मूळ वेतनाच्या २७ टक्के घरभाडे भत्ता स्विकारुन अद्यापर्यंत २५२० सफाई कामगारांनी सेवा निवासस्थाने रिक्त केली आहेत. तसेच पर्यायी भाड्याच्या घराची व्यवस्था केली आहे.

(२) व (३) संक्रमण शिबीर बांधण्यास जागा उपलब्ध नसल्यामुळे तसेच संक्रमण शिबीर बांधण्यास दोन वर्षांचा कालावधी लागत असल्यामुळे संक्रमण शिबीर बांधणे तुर्तास शक्य नाही, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सिडकोने नियुक्त केलेल्या संयुक्त भागीदारीतील एका खाजगी सल्लागार संस्थेला कामाकरीता कोट्यवधी रुपयांची दलाली देण्यात आल्याबाबत

**(४७) * २१९८० श्री.अंबादास दानवे, श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईतील सिडकोच्या घरांचे मार्केटिंग व विक्रीसाठी सिडकोने संयुक्त भागीदारीतील एका खाजगी सल्लागार कंपनीची नियुक्ती केली असून सदरहू कंपनीला उक्त कामाकरीता रुपये ६९९ कोटी दलाली दिल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत लोकप्रतिनिधी व सामाजिक संघटनानी आक्षेप घेतल्यानंतर नगरविकास विभागाने सिडकोस अहवाल सादर करण्याबाबत निर्देश देऊनही सिडकोने अद्यापही अहवाल सादर केला नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नगरविकास विभागाने निर्देश देवूनही अहवाल प्राप्त करुन देण्यास दिरंगाई करणाऱ्या सिडकोच्या संबंधित अधिकारी व कर्मचारी यांचेवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) नवी मुंबईतील सिडकोमार्फत बांधण्यात येणाऱ्या घरांची विक्री, मार्केटिंग व जाहिरातीसाठी सिडकोने रीतसर कार्यपध्दतीचा अवलंब करुन M/s. Heliosmedium Bazaar Pvt. Ltd. & M/s. Thoughtrains Designs Pvt. Ltd. JV यांची सल्लागार म्हणून नियुक्ती केली असून या कामासाठी त्यांना रुपये ६९९ कोटीचा कंत्राट देण्यात आले आहे.
(२) हे खरे नाही. यासंदर्भात शासनाच्या दिनांक ३/०८/२०२३ रोजीच्या पत्रान्वये सिडको महामंडळाकडून अहवाल मागविण्यात आला होता.त्यानुषंगाने सिडकोने दिनांक ११/०८/२०२३ रोजी अहवाल शासनास सादर केला आहे.
(३) सिडकोने सादर केलेल्या दिनांक ११/०८/२०२३ रोजीच्या अहवालाच्या अनुषंगाने शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कुर्ला येथील लालबहादूर शास्त्री मार्गावरील रहदारीकरीता आकाश मार्गीका (स्कायवॉक) बांधण्याबाबत

**(४८) * २१६७० श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कुर्ला (मुंबई) येथील लालबहादूर शास्त्री मार्गावरील रहदारी आणि परिसरातील नागरिकांची वाढती गर्दी विचारात घेता आकाश मार्गीका (स्कायवॉक) बांधण्याचा निर्णय बृहन्मुंबई महानगरपालिकेने दोन वर्षांपूर्वी घेतला असून निविदा काढून १५ महिन्यांत या मार्गीकेचे काम पूर्ण करण्याचे कंत्राट दिले असतानाही दोन वर्षाचा कालावधी उलटूनही अद्याप या मार्गीकेचे काम प्रलंबित असल्याची बाब दिनांक १७ ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मार्गीकेचे काम पूर्ण झाल्यास नियमितपणे ये-जा करणाऱ्या पादचाऱ्यांना मदत होणार असून, प्रस्तावित मेट्रो स्थानकाला जोडला जाणार असल्याने रस्त्यावरील पादचाऱ्यांची गर्दी कमी होण्यास मदत होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर प्रकरणी दोषी असणाऱ्या कंत्राटदारांवर बृहन्मुंबई महानगरपालिकेने कोणती कारवाई केली तसेच महानगरपालिकेतर्फे अपूर्ण स्कायवॉक व्यवस्थापनावर नियंत्रण ठेवणे व स्कायवॉकचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.

कुर्ला (प.) येथील टॅक्सीमेन कॉलनी ते श्रीकृष्ण चौक पर्यंत आकाशमार्गीका (स्कायवॉक) बांधण्याच्या कामाचे कार्यादेश नियुक्त कंत्राटदाराला दिनांक १८/०८/२०२१ रोजी देण्यात आले होते. सदर काम दिनांक ०१/१०/२०२१ पासून सुरू करण्याचे आदेश देण्यात आले होते. परंतु, आकाशमार्गीकेच्या नियोजित जागेवर विविध सेवापूरवठादारांच्या भूमिगत सेवा वाहिन्या, बाधित बांधकामांचे अतिक्रमण, बाधित जलवाहिन्या, इत्यादी अडथळे असल्याकारणाने आकाशमार्गीकेच्या कामास विलंब होत आहे.
(२) सदर मार्गिकेचे काम पूर्ण झाल्यास ये-जा करणाऱ्या पादचाऱ्यांना मदत होणार आहे. परंतु, सद्य:स्थितीत या ठिकाणी मेट्रो स्थानक प्रस्तावित नसल्याने सदर स्कायवॉक मेट्रो स्थानकाला जोडण्याचे कोणतेही काम आकाशमार्गीकेच्या कामात अंतर्भूत नाही.
(३) सदर आकाशमार्गीकेचे अंदाजे ३० टक्के काम पूर्ण करण्यात आले असून उपलब्ध जागेवर एकूण १३ पैकी ७ ठिकाणी आकाशमार्गीकेच्या पाया भरणीचे काम पूर्ण करण्यात आले आहे. तसेच ५ ठकिाणी पीलर्सचे बांधकाम पूर्ण करण्यात आले आहे.

सदर कामाचा कंत्राट कालावधी १५ महिने (पावसाळा वगळून) इतका असून काम पूर्ण करण्याची मुदत दिनांक २२/०४/२०२४ पर्यंत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे मुख्यालय/ विभागीय कार्यालयासह अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानांच्या इमारतींचा पुनर्विकास करण्याबाबत

**(४९) * २१२३३ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या मुख्यालयासह अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या वसाहती आणि मुंबई विभागीय कार्यालयाच्या इमारतीचे आयुर्मान ५० ते ६० वर्षापेक्षा अधिक झाले असून विद्याविहार (मुंबई) येथील महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे विभागीय कार्यालय असलेल्या इमारतीची दुरवस्था झाली असून सदरच्या इमारतीचा पुर्नविकास व त्या १० एकर जागेत विभागीय कार्यशाळा, भंडार मुद्रणालय, अधिकारी/कर्मचारी निवासस्थाने व्यापारी संकुल करण्याच्या प्रस्तावास महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने ठरावाद्वारे माहे जुलै, २०१७ च्या अखेरीस मान्यता दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांनी शासनाकडे पाठविलेला प्रस्ताव नामंजूर झाला असून सुधारित प्रस्ताव पुन्हा मंजूर करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली,
(३) असल्यास, चिंचबंदर येथील राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या वसाहतीच्या इमारतीवर आतापर्यंत रुपये ८६ लाखांपेक्षा जास्त रक्कम खर्च करुन दुरुस्ती केल्यानंतर स्ट्रक्चरल ऑडिटमध्ये सदर इमारत धोकादायक असल्याचे दर्शवून तातडीने रिक्त करण्यात यावी अशा आशयाच्या सुचना संबंधित विभागाकडून देण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मुंबईतील विद्याविहार येथील राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या अत्यंत धोकादायक असलेल्या इमारतीची पुनर्बांधणी आवश्यक असतानाही महामंडळाने डागडुजी व दुरुस्तीसाठी रुपये १ कोटी ६६ एवढया रकमेचे कंत्राट माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये काढण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, मुंबईतील राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या मुख्यालयासह अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या वसाहतीतील इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडीट करून सदर इमारतींच्या डागडुजी व दुरुस्तींसाठी खर्च न करता नवीन इमारती बांधण्याचा सुधारित प्रस्ताव पुन्हा मंजूर करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय.
(२) सदर ठिकाणांकरीता "बांधा, वापरा व हस्तांतरीत करा" या तत्वावर उभारण्यासाठी माहे मे २०२२ तसेच डिसेंबर २०२२ मध्ये शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.
(३) व (४) होय.
(५) मुंबईतील एसटी महामंडळाच्या मुख्यालयासह अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या वसाहतीतील इमारत "बांधा, वापरा व हस्तांतरीत करा" या तत्वावर उभारण्यासाठी प्रस्तावित करण्यात आले आहे.
(६) १.रा.प.मुंबई सेंट्रल बसस्थानक, आगार, अधिकारी/कर्मचारी निवासस्थान रा.प. मुख्यालय यांची पुनर्बांधणी करणेसाठी शासन निधी उपलब्ध न झाल्यामुळे सदर प्रकल्प हा "बांधा, वापरा व हस्तांतरीत करा" या योजनेत समाविष्ट करण्यात आला आहे.
२. रा.प.विद्याविहार येथील भूखंडाच्या विकास करणेसाठी शासन निधी उपलब्ध न झाल्यामुळे सदर प्रकल्प हा "बांधा, वापरा व हस्तांतरीतकरा" या योजनेत समाविष्ट करण्यात आला आहे.
३. चिंचबंदर येथील इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडीट करुन सदरील इमारतीची पहिल्या टप्प्यात बाहेरील बाजुने दुरुस्ती करण्यात आली आहे. तसेच सदर दुरुस्तीनंतर निवासस्थानावरील दुरुस्तींचे काम करण्यात आली आहेत. सदर इमारतीचे IIT मुंबई यांचेकडून पुन:श्च स्ट्रक्चरल ऑडीट करण्याबाबतची कार्यवाही चालू आहे.

-----------------

## राज्यात शासकीय वाहनांना प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्र बाळगण्याची सक्ती करण्याबाबत

**(५०) * २१८०७ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोटार वाहन कायदयानुसार जुन्या वाहनांना सन २०१९ पासून प्रदुषण नियंत्रण प्रमाणपत्र (पीयूसी प्रमाणपत्र) बंधनकारक असताना अनेक शासकीय वाहनांचे प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्र (पीयूसी प्रमाणपत्र) नसल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वाहनांचे प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्र (पीयूसी प्रमाणपत्र) करण्यात आले नसल्यास सर्वसामान्य वाहनधारकांना दंड आकारण्यात येतो त्यानुषंगाने शासकीय वाहनांची तपासणी करुन प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्र (पीयूसी प्रमाणपत्र) बाळगण्याची सक्ती करण्याबाबतचे आदेश शासनाने तात्काळ जारी करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, सिस्कॉम (सिस्टीम करेक्टिंग मूव्हमेंट) ही संस्था गत काही वर्षांपासून शासकीय व्यवस्थांमधील त्रुटी, उणिवांचा अभ्यास करून त्या सुधारण्यासाठी शासनास नवे पर्याय देण्याचे काम करत असून सदर संस्थेने केलेल्या सर्व्हेक्षणात शासकीय वाहनांनी वाहतुकीच्या नियमाचे उल्लंघन केल्याचे तसेच, पीयूसी व फिटनेस प्रमाणपत्र नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, वाहन ज्या सरकारी अधिकाऱ्याच्या नावावर आहे, त्याने वाहन सुस्थितीत ठेवणे, वाहतुकीच्या नियमांचे कसोटीने पालन करण्याची जबाबदारी असताना, अधिकाऱ्यांना याचे गांभीर्य नसल्याचे सर्वेक्षणातून निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, शासकीय वाहनांची नोंदणी त्या विभागाच्या प्रमुखपदी असलेल्या वर्ग एक आणि त्यावरील अधिकाऱ्यांच्या नावाने होत असून प्रदूषण कायद्याच्या होणाऱ्या प्रशासकीय पातळीवरील उल्लंघनाची दखल घेऊन संबंधित प्रकरणी दोषी असणाऱ्या महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, परिवहन विभागाचे आयुक्त, प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांनी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) दिनांक १८/०९/२०२३ व दिनांक ०९/१०/२०२३ रोजी वृत्तपत्रात अशा आशयाची बातमी प्रसिध्द झाली होती.
(२) केंद्रीय मोटार वाहन अधिनियम, १९८९ मधील नियम ११५ नुसार प्रत्येक वाहनास (ईलेक्ट्रीक वाहन सोडून) वैध पी.यु.सी. प्रमाणपत्र बाळगणे बंधनकारक आहे.

राज्यात वायुवेग पथकांमार्फत पी.यु.सी. प्रमाणपत्र न बाळगणाऱ्या वाहनांविरुध्द मोटार वाहन अधिनियम १९८९ चे नियम ११६ अन्वये नियमाप्रमाणे नियमितपणे कारवाई करण्यात येते.

परिवहन आयुक्त कार्यालयाच्या दिनांक ०७/११/२०२३ रोजीच्या परिपत्रकान्वये राज्यामध्ये वाहनांची प्रदूषण नियंत्रण तपासणी मोहीम राबविण्यात येत आहे.
(३) व (४) सिस्कॉम (सिस्टीम करेक्टिंग मूव्हमेंट) या खाजगी संस्थेने प्रादेशिक परिवहन अधिकारी पुणे यांना दिनांक २८/१२/२०२२ रोजीच्या पत्राद्वारे ८० शासकीय वाहनांना पी.यु.सी. प्रमाणपत्र नसल्याची तक्रार केली होती. सदर पत्रासोबत सादर केलेल्या यादीतील शासकीय वाहनांच्या पीयुसी प्रमाणपत्राच्या वैधतेबाबत वाहन संगणकीय प्रणालीवर अवलोकन केले असता एकूण ८१ वाहनांपैकी १५ वाहनांचे पीयुसी अद्यावत असल्याचे आढळले. उर्वरित वाहनांबाबत संबंधित कार्यालयांना पीयुसी प्रमाणपत्र अद्यावत करणेकरीता परिवहन आयुक्त कार्यालयाकडून सूचना जारी करण्यात आल्या आहेत. वाहन कायद्यातील पीयुसीच्या तरतुदीनुसार वैध पीयुसी प्रमाणपत्राविना रस्त्यावर चालणाऱ्या वाहनांवर कारवाई करण्याच्या सूचना वायुवेग पथकांना देण्यात आल्या आहेत.

(५) नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांवर व वाहनचालकांविरुध्द नियमानुसार कारवाई केली जाते. तसेच परिवहन विभागामार्फत वायु प्रदूषण तपासणीच्या मोहिमा नियमितपणे राबविल्या जातात.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गोराई (मुंबई) येथील रस्त्यांच्या कामादरम्यान सुरक्षेच्या उपाययोजना करण्याबाबत

**(५१) * २१११४ श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गोराई गावात रस्त्याच्या कामादरम्यान खोदून ठेवलेल्या चेंबरमध्ये एक ११ वर्षाचा मुलगा पडून त्याचा हात मोडल्याची घटना दिनांक १ ऑक्टोबर, २०२३ रोजी घडली असून, गावात सद्य:स्थितीत रस्त्याच्या कामासाठी चेंबर खुली करून ठेवणे, अरुंद रस्त्याच्या बाजूला टाकण्यात आलेले मातीचे ढिगारे यामुळे वाहने घसरून अपघात होण्याची अथवा पादचारी पडण्याची भीती निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गोराई गावात रस्त्याच्या कामादरम्यान सुरू असलेल्या हलगर्जीपणाबाबत स्थानिक नागरिकांनी प्रशासनाकडे वारंवार तक्रारी करून देखील प्रशासनाकडून आजपर्यंत कोणतीही दखल घेण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने गोराई गावातील रस्त्यांच्या कामादरम्यान सुरक्षेच्या उपाययोजना राबविण्यात हलगर्जीपणा करणाऱ्या ठेकेदारांविरुध्द व संबंधित प्रशासकीय अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२), (३) होय, हे अंशतः खरे आहे.

गोराई गावात रस्त्याच्या कामादरम्यान चेंबरमध्ये एक ११ वर्षांचा मुलगा पडून त्याचा हात मोडल्याच्या घटनेबाबतची बातमी स्थानिक वृत्तपत्रात छापून आल्यानंतर महानगरपालिकेमार्फत सदर ठिकाणी चौकशी केली असता, गोराई गावात रस्त्याच्या कामादरम्यान दिनांक १ ऑक्टोबर, २०२३ रोजी एक ११ वर्षाचा मुलगा सायकलवर खेळत असताना समोरून येणारी गाडी वाचविण्याच्या प्रयत्नात तो चेंबरच्या भोवती लावण्यात आलेल्या बॅरिकेटसवर धडकून त्याच्या हाताला दुखापत झाल्याची घटना घडली असल्याचे स्थानिक नागरिकांमार्फत समजले. याव्यतिरिक्त स्थानिक नागरिकांकडून कोणत्याही प्रकारची लेखी तक्रार महानगरपालिकेस प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.

सदर ठिकाणी गोराई गांव मुख्य रस्त्याचे (उत्तन गाव ते मनोरीपर्यंत) सुधारीकरणाचे काम महानगरपालिकेमार्फत हाती घेण्यात आलेले आहे. रस्त्यांच्या सुधारीकरणाच्या कामांतर्गत रस्त्याच्या बाजूला उपयोगिता वाहिनीचे चेंबर बनवण्याचे काम हाती घेण्यात येते. सदर चेंबर बनविण्याच्या कामादरम्यान खोदकाम केलेल्या ठिकाणी पूर्णपणे बॅरिकेटस करून योग्य त्या सुरक्षा उपाययोजना करण्यात येतात. त्यामुळे वाहनांचा अपघात होण्याची व पादचारी पडण्याची भिती निर्माण होत नाही. तसेच सदर रस्त्यांच्या खोदकामाच्या दरम्यान निघालेली माती महानगरपालिकेमार्फत वेळोवेळी त्वरित उचलण्यात येते.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील सागरी रस्त्याच्या (कोस्टल रोड) चारही टप्प्यांची कामे पूर्ण करण्याबाबत

**(५२) * २१६४४ ॲड.अनिल परब, श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील सागरी रस्त्याच्या (कोस्टल रोड) चारही टप्प्यांची कामे पूर्ण होण्याची वाढीव मुदत संपून चौथ्या वेळेस मुदतवाढ देण्यात आली असून विविध कारणांनी सतत मुदतवाढ देण्यात आल्याने प्रकल्प खर्चात रुपये ३०० कोटींची वाढ झाली असून शासनावर व पर्यायाने नागरिकांवर वाढीव करांच्या रूपाने आर्थिक भार पडला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तांत्रिक आराखड्यात बदल झाल्यामुळे मुंबईच्या सागरी किनारा मार्ग प्रकल्पासाठी सल्लागाराच्या खर्चात पाचव्यांदा वाढ करुन मूळ खर्च रुपये ३५ कोटी असलेले शुल्क आता रुपये ९० कोटींवर असून सार्वजनिक वाहतुकीसाठी (बेस्ट बसेस) वेगळी लेन उपलब्धतेबाबत, सागरी किनारा मार्गाची सद्य:स्थिती जाणून सदर प्रकल्पाचे काम पूर्ण होण्यासाठी अजून किती कालावधी अपेक्षित आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने तांत्रिक आराखड्यात वारंवार बदल करुन प्रकल्प मुदतीत पूर्ण न केलेल्या ठेकेदार कंपनीवर कोणती कारवाई केली तसेच प्रकल्प मुदतीत पूर्ण होण्यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) मुंबई किनारी रस्ता प्रकल्पाचे काम माहे ऑक्टोबर, २०१८ पासून सुरु झाल्यानंतर विविध न्यायालयीन आदेश मार्च, २०२० मध्ये उद्भवलेली कोविड-१९ ची जागतिक महामारी तसेच स्थानिक कोळी बांधवांनी आपल्या मागण्यांसाठी केलेल्या आंदोलनामुळे प्रकल्पाला विलंब झालेला आहे. तथापि, प्रकल्पामध्ये झालेल्या विलंबामुळे प्रकल्प खर्चात कोणतीही अतिरिक्त वाढ झालेली नाही.

प्रकल्प खर्चात झालेली वाढ मुख्यत्वेकरुन केंद्र सरकारच्या वस्तु व सेवाकरातील वाढ, सदर प्रकल्पातील प्रस्तावित १२० मीटर अंतराचा जलवाहतूक मार्ग इत्यादी अतिरिक्त कामांमुळे झालेली असून, सदर वाढ प्रकल्प पूर्ण करण्यासाठी आवश्यक आहे.

सदर कारणांमुळे किनारी रस्ता प्रकल्पामध्ये विलंब झाल्याने नियुक्त साधारण सल्लागाराच्या कंत्राट कालावधीमध्ये वाढ झाल्यामुळे व सदर प्रकल्पातील प्रस्तावित १२० मीटर अंतराचा जलवाहतूक मार्गाच्या आराखड्यांची छाननी, एकात्मिक केंद्रीकृत नियंत्रण केंद्राचे पर्यवेक्षण व सुशोभिकरणाच्या कामाचे सल्लागार अशी त्यांना देण्यात आलेली अतिरिक्त कामे इत्यादींमुळे त्यांच्या शुल्कात वाढ झालेली आहे.

सदर प्रकल्पामध्ये सार्वजनिक वाहतुकीसाठी बेस्ट सुविधा, अग्निशमन वाहन तसेच रुग्णवाहिकेकरीता स्वतंत्र मार्गिका प्रस्तावलेली आहे.

सदर प्रकल्पाचे काम माहे मे, २०२४ मध्ये पूर्ण होणे अपेक्षित आहे.

(३) वरळी येथील किनारी रस्ता पुलाच्या बांधकामाद्वारे वांद्रे वरळी सागरी सेतूला जोडला जाणार असून, सदर ठिकाणी स्थानिक कोळी बांधवांनी केलेल्या मागणीमुळे पुलाच्या दोन खांबांमधील निव्वळ अंतर ६० मीटरवरुन १२० मीटर करण्याचे प्रस्तावले आहे. सबब सदर प्रकल्पाच्या तांत्रिक आराखड्यात बदल करावा लागला असून त्याकरीता ठेकेदार जबाबदार नाहीत.

सदर पुलाचे काम दिनांक ३१/०५/२०२४ पर्यंत पूर्ण होण्याच्या दृष्टीने ठेकेदारामार्फत अत्याधुनिक तंत्रज्ञान व अतिरिक्त मनुष्यबळाचा वापर करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सिडको - जेएनपीए प्रकल्पांतर्गत ठेकेदारांकडून करण्यात आलेल्या कोट्यवधी रुपयांच्या गैरव्यवहाराबाबत

**(५३) * २१८१२ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जवाहरलाल नेहरु पोर्ट प्राधिकरण (जेएनपीए) प्रकल्पग्रस्तांना साडेबारा टक्के विकसित भूखंड वाटपासाठी सुरू असलेल्या १११ हेक्टर क्षेत्रातील भरावासाठी ठेकेदारांनी माती, मुरूम, दगडाऐवजी मोफत मिळणाऱ्या टाकाऊ डेब्रिजचा मोठ्या प्रमाणावर वापर करून सिडको व जेएनपीए यांनी यामध्ये कोट्यवधी रक्कमेचा गैरव्यवहार केला असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ठेकेदारांकडून होणाऱ्या फसवणुकीमुळे संतप्त शेतकऱ्यांनी सिडको व जेएनपीएकडे टाकाऊ डेब्रिज काढून टाकण्याच्या केलेल्या मागणीनुसार सिडकोने सुमारे ३ हजार शेतकऱ्यांची २ हजार ७०० हेक्टर जमीन संपादन केली असून, खातेदार असलेल्या ३ हजार शेतकऱ्यांच्या १२ हजार वारसांना जेएनपीएने भूखंडाचे वाटप केले नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ठेकेदार एकीकडे सिडको व जेएनपीएमध्ये भरावाचे काम तर दुसरीकडे मोफत मिळणाऱ्या टाकाऊ डेब्रिजचा वापर करुन निकृष्ट दर्जाचे काम करत कोट्यवधीचा अपहार करत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने भरावाचे काम निकृष्ट दर्जाचे करुन कोट्यवधी रुपयांचा अपहार करणाऱ्या ठेकेदारास व इतर संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२), (३) व (४) शासन निर्णय दिनांक १४/०८/२०१४ नुसार केंद्र शासनाच्या मंजुरीप्रमाणे जे.एन.पी.ए. मार्फत उपलब्ध करुन दिले जाणारे क्षेत्र ताब्यात घेवून ते वितरीत करुन जे.एन.पी.ए. ने पात्र ठरविलेल्या प्रकल्पग्रस्तांना विकसित भूखंडांचे निव्वळ संगणकीय सोडत घेवून भूखंड इरादित करुन वाटप करण्याची कार्यवाही सिडको महामंडळामार्फत केली जाते. त्यानुसार जे.एन.पी.ए. ने पाठविलेल्या १९३ संचिकेमध्ये सिडकोमार्फत ५ संगणकीय सोडती घेऊन १९३ भूखंड इरादित केले आहे.

सद्य:स्थितीत जे.एन.पी.ए. मार्फत २० संचिकेतील नव्याने प्राप्त झालेल्या पात्र प्रकल्पग्रस्तांची संगणकीय सोडत घेण्याची कार्यवाही सुरु आहे. १२.५टक्के योजनेंतर्गत भूखंड वाटपाची पूर्ण जबाबदारी जे.एन.पी.ए. यांची आहे.

दास्तान फाटा, गाव जासई, द्रोणागिरी, नवी मुंबईजवळ सुमारे १११ हे. क्षेत्रामध्ये जे.एन.पी.ए.च्या प्रकल्पग्रस्तांसाठी १२.५ टक्के योजनेंतर्गत भूखंडाचे वाटप करण्यासंदर्भातील कामामधील लागणारी माती/मुरुम/दगड पुरविण्याचे कामामध्ये स्थानिक प्रकल्पग्रस्तांनी ठेकेदारांच्या परवानगीशिवाय सदर जागेत डेब्रिजच्या गाड्या खाली केल्या होत्या त्याविरुध्द पोलीस आयुक्त, नवी मुंबई यांच्याकडील पोलीसांचे

संरक्षण मिळणेबाबत दिनांक ४/०१/२०२३ रोजी सिडकोने विनंती केली होती. त्यानंतर कामाच्या ठिकाणी टाकलेले डेब्रिज संबंधित ठेकेदारांकडून पूर्णपणे उचलण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विविध विभागांतील अभियंता संवर्गातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(५४) * २१४०३ श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेतील विविध संवर्गातील ४२ हजार पदे रिक्त असून त्यातील अभियंता संवर्गातील रिक्त असलेल्या पदांपैकी ६६४ अभियंत्यांची पदे भरली जाणार असून शासनाकडे महानगरपालिकेतील अभियंत्यांची भरती प्रक्रियेची बिंदुनामावली नोंदवही पडताळणीबाबतची कार्यवाही प्रलंबित असल्यामुळे सदर भरतीची जाहिरात प्रकाशित होऊ शकली नसल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रलंबित भरती प्रक्रीयेमुळे मुंबईतील अनेक प्रभागात अभियंता कार्यरत नसल्यामुळे अनेक नागरी सुविधा उपलब्ध होण्यास मोठ्या प्रमाणात विलंब होत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बृहमुंबई महानगरपालिकेत विविध विभागांतील जागा रिक्त असल्यामुळे कार्यरत कर्मचाऱ्यांवर कामाचा अतिरीक्त ताण येत असल्यामुळे शासनाने कार्यरत कर्मचाऱ्यांना निवडणूक कामांची जबाबदारी देवू नये त्यासाठी सेवानिवृत्त झालेल्या आणि इच्छुक असलेल्या कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्याची मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने माहिती व निर्णय घेवून मुंबईतील नागरिकांना नागरी सुविधा उपलब्ध होण्याच्या दृष्टीने बृहन्मुंबई महानगरपालिकेतील विविध संवर्गांच्या रिक्त जागा भरण्यासह इतर मागण्या पूर्ण करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेत माहे जून, २०२३ अखेरपर्यंत विविध आस्थापनेवर वर्ग १ ते ४ मध्ये एकूण ९४,३२७ इतकी पदे कार्यरत असून ५०,४०७ इतकी पदे रिक्त आहेत. तसेच अभियांत्रिकी संवर्गामध्ये दिनांक ३१/१२/२०२२ पर्यंत ६७१ पदे रिक्त आहेत.
(२) व (३) बृहन्मुंबई महानगरपालिकेतील विविध खाते / विभागात विविध संवर्गातील पदे रिक्त असल्याने तसेच कामगार / कर्मचारी / अधिकारी यांना निवडणूक प्रक्रियेच्या कामकाजासाठी पाठविण्यात येत असल्याने, कार्यरत अल्प कर्मचाऱ्यांवर कामाचा ताण येतो. त्यामुळे भारतीय निवडणूक आयोगाने राज्यस्तरीय मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना पाठविलेले दिनांक ०४/१०/२०२२ रोजीचे पत्र लक्षात घेऊन सेवानिवृत्त झालेल्या व इच्छुक असलेल्या कामगार, कर्मचारी व अधिकाऱ्यांची नेमणूक निवडणूक प्रक्रियेच्या कामकाजासाठी करण्याचे निवेदन कामगार संघटनेकडून महानगरपालिकेस प्राप्त झाले आहे.

तथापि, निवडणूक अधिकाऱ्यांकडून निवडणूक कामाकरीता कार्यरत कर्मचाऱ्यांची मागणी होत असल्याने त्यानुसार कार्यरत कर्मचाऱ्यांची सेवा निवडणूक कामासाठी महानगरपालिकेमार्फत उपलब्ध करुन दिली जात आहे.

(४) कनिष्ठ अभियंता (स्थापत्य / यांत्रिकी व विद्युत) व दुय्यम अभियंता (स्थापत्य / यांत्रिकी व विद्युत / वास्तुशास्त्रज्ञ) संवर्गाची सरळसेवेतील रिक्त पदे भरण्याच्या प्रस्तावास महानगरपालिका आयुक्तांची मंजुरी प्राप्त झाली आहे. सद्य:स्थितीत शासनाकडून सहाय्यक आयुक्त व मागासवर्ग कक्ष, कोकण भवन यांचेकडून कनिष्ठ अभियंता (स्थापत्य / यांत्रिकी व विद्युत) व दुय्यम अभियंता (यांत्रिकी व विद्युत / वास्तुशास्त्रज्ञ) या संवर्गाची बिंदुनामावली पडताळणी प्रक्रिया पूर्ण झाली आहे. तसेच, दुय्यम अभियंता (स्थापत्य) संवर्गाची बिंदुनामावली पडताळणीबाबतची कार्यवाही सुरु आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या महसूल उत्पन्नात घट व महसुली खर्चात वाढ झाल्याने, महसुली खर्चातील काटकसरीतील उपाययोजना म्हणून पदांची आवश्यकता व निकड विचारात घेऊन नवीन सरळसेवा पदभरती टप्प्या-टप्प्याने करण्यात येत आहे. सद्य:स्थितीत बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये एकूण ८६७५ पदांची भरती प्रक्रिया कार्यान्वित आहे.

मुंबईतील नागरिकांना नागरी सुविधा उपलब्ध होण्याच्या दृष्टीने, महापालिकेतील अत्यावश्यक सेवेमध्ये संबंधित विभागामार्फत आवश्यकतेनुसार बाह्यस्त्रोत्राद्वारे कंत्राटी तत्वावर मनुष्यबळ उपलब्ध करण्यात येऊन कामकाज करण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :** **जितेंद्र भोळे**
**नागपूर.** **सचिव (१) (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.